# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०२४

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५


वर्ष चोविसावे


अंक सातवा


## स.शं.देसाई

जयंती : २५ जुलै, १९१७

स्मृतिदिन : ३१ मे, १९९६













## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**



### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

- १ जानेवारी, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२४ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.
- अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत
- पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२५ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक सातवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिध्दी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **पुरस्कार** | **१०** |
| **प्रकाशन** | **१२** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| कालचक्राचे रक्षक | १६ |
| उजळे जगण्याचा दीप | २४ |
| रुमी : आनंदघन | ३० |
| अमर हृदय | ३८ |
| रिप्ले | ४४ |
| रेषेपलीकडील लक्ष्मण | ४८ |
| **अभिप्राय** | **५६** |
| **दिनविशेष** | **६१** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.




## संपादकीय

### पोर्तुगीज भाषेचे जाणकार इतिहासकार स. शं. देसाई

'महापर्व', 'चंबळेच्या पलीकडे', 'अखेरची लढाई' अशा कादंबऱ्या, 'पहिले जागतिक महायुद्ध' आणि 'दुसरे जागतिक महायुद्ध' या विषयांवर लेखन करणारे साहित्यिक-संशोधक स. शं. देसाई हे मूळचे गोव्याचे. वर उल्लेख केलेली पुस्तके आजही त्याच कुतूहलाने वाचली जातात. ऐतिहासिक विषयांवरील व्यक्तिरेखा नजरेसमोर ठेवून केलेले लिखाण हे सहसा वाचक उत्सुकतेने वाचतोच वाचतो. स. शं. देसाई यांनी 'महापर्व' या कादंबरीत छत्रपती संभाजी महाराज यांच्या निर्घृण हत्येनंतरचा मराठेशाहीचा कालखंड चित्रित केला आहे. दिल्लीपती औरंगजेब, मराठ्यांचा तिसरा छत्रपती शिवपुत्र राजाराम, संताजी घोरपडे व धनाजी हे बिनीचे लढवय्ये सेनानी व राजाराम महाराजांची पत्नी ताराराणी या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आपल्यासमोर येत राहतात. दहा लाख सैन्य घेऊन मराठेशाहीचे पारिपत्य करायला आलेला औरंगजेब स्वत:ची कबरही या महाराष्ट्राच्या मातीतच खोदतो. या कालखंडाचा साद्यंत आढावा घेणारी, लालित्यपूर्ण शैलीत लिहिलेली कादंबरी म्हणून 'महापर्व' या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

'चंबळेच्या पलीकडे' या कादंबरीची सुधारित आवृत्ती आम्ही प्रकाशित केली आहे. या कादंबरीत महादजी शिंदे या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची कारकीर्द उत्तरेत कशाप्रकारे बहरली याचा लेखाजोखा मांडलेला पाहायला मिळतो. मराठी दौलतीची निरपेक्ष सेवा करणारे, अंतर्गत बंडाळीने व्यथित होणारे, राघोबादादांचा बीमोड करण्यासाठी, इंग्रजांना वठणीवर आणण्यासाठी तत्पर असणारे महादजी शिंदे आपल्या मनावर ठसतात. ग्वाल्हेर येथे मराठेशाहीचा झेंडा डामडौलाने फडकवत ठेवून, इंग्रजांना वेळप्रसंगी शरण यायला लावून, आपला पराक्रम दाखवणारा एक लढवय्या, अशी त्यांची अनेक रूपे आपल्यासमोर उलगडतात. सातारा जिल्ह्यातील कण्हेरखेड या गावचे असणारे शिंदे आपल्या कर्तृत्वाने उत्तरेत आपले साम्राज्य प्रस्थापित करतात व त्या बळावर एक वेगळी जरब भारतभर बसवतात.

'अखेरची लढाई' या कादंबरीत चित्रित झालेला कालखंड-देखील पेशवाईचा आहे. नाना फडणवीस यांची मुत्सद्देगिरी व मराठी दौलतीचा उतरणीचा काळ याचे चित्रण या कादंबरीत केले आहे. जवळजवळ दोन तपे म्हणजेच चोवीस वर्षे नाना फडणवीस यांनी पेशवाईचे कारभारी म्हणून काम पाहिले. एक चतुर, मुत्सद्दी, द्रष्टा, धोरणी असा राजकारणपटू ही नानांची ख्याती होती. माधवराव पेशवे ते सवाई माधवराव, असा प्रदीर्घ कालखंड या छोटेखानी कादंबरीने मांडलेला आपल्याला पाहायला मिळतो. मराठेशाहीचा अस्त होण्यापूर्वीचा काळ, त्यातील शह-काटशहाचे राजकारण, यावरील एक वाचनीय अशी ही कादंबरी आहे.

'पहिले जागतिक महायुद्ध' व 'दुसरे जागतिक महायुद्ध' या पुस्तकांतून सहज-सुलभ भाषेत दोन्ही युद्धांचे जगावर झालेले परिणाम व त्याचे पडसाद याचे वर्णन आपल्याला वाचायला मिळते. पहिल्या महायुद्धात जवळपास एक कोटी माणसे मृत्युमुखी पडली. पाहायला गेलं तर हा आकडा मोठा आहे व याच महायुद्धात दुसऱ्या महायुद्धाची बीजेही रोवली गेली, हे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते. अमेरिकेची

अलिप्तता, हेच यामागचे एक महत्त्वाचे कारण ठरले. त्या वेळेस अमेरिकेने जर राष्ट्रसंघाच्या राजकारणात भाग घेतला असता तर दुसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवले नसते. पहिल्या महायुद्धात जर्मनीवर झालेला अत्याचार व त्यांची झालेली दुर्दशा, यामुळे जर्मनीमधील तरुण सुडाने पेटून उठले होते, त्याचेच रूपांतर पुढे दुसऱ्या महायुद्धात झाले. हिटलरची महत्त्वाकांक्षा व त्याप्रमाणे हिटलरने केलेली वाटचाल याचा आढावा 'दुसरे जागतिक महायुद्ध' या पुस्तकात घेतलेला आहे. हिटलरच्या महत्त्वाकांक्षेतून सुरू झालेल्या युद्धाचा शेवट अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर केलेल्या अणुबॉम्बच्या हल्ल्यानंतर झाला; पण या युद्धाचे परिणाम मात्र सर्व जगाला भोगावे लागले. हे कटू सत्य आहे.

प्रा. स. शं. देसाई हे प्रामुख्याने पोर्तुगीज भाषेचे जाणकार. त्यांनी जशी मराठीत साहित्यनिर्मिती केली त्याचप्रमाणे संशोधनाच्या क्षेत्रातही स्वत:चा अमीट ठसा उमटवला. शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागात कार्यरत असताना देसाई यांनी पोर्तुगीज कागदपत्रांतील महत्त्वाच्या दस्तऐवजांचे मराठीत भाषांतर करून ते मराठी इतिहास अभ्यासकांसाठी उपलब्ध केले. सेतुमाधवराव पगडी यांनी जसे फारसी भाषेतील दस्त भाषांतरित करून मराठीत आणले, त्याचप्रमाणे स. शं. देसाई यांनी मराठेशाहीचा महत्त्वाचा कालखंड समजला जाणारा छ. राजाराम महाराज व ताराबाईंचा कालखंड, त्याचे महत्त्वाचे दस्त मराठीत भाषांतरित केले. पोर्तुगीज दप्तरातील साधने स. शं. देसाई यांच्यामुळे मराठीत सहजगत्या उपलब्ध झाली, हे इथे कृतज्ञतेने नमूद करावेसे वाटते.

या २५ जुलै रोजी स. शं. देसाई यांची १०७वी जयंती. साक्षेपी इतिहाससंशोधक व लेखक स. शं. देसाई यांना विनम्र अभिवादन!

अखिल
मेहता

## नवी संहिता... नवा आशय...


### इंडियाज रेल्वेमॅन

**राजेंद्र बी. आकलेकर**

अनुवाद

**अनुराधा राव**

कोकण रेल्वे प्रकल्प आणि दिल्ली मेट्रोसारखी आव्हानं पेलणाऱ्या श्रीधरन यांचं प्रेरणादायक चरित्र





**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

### डेंजरस माइंड्स

**एस. हुसैन झैदी**
**ब्रिजेश सिंग**

अनुवाद

**अमृता दुर्वे**




सज्जन भासणाऱ्यांमध्येच रुजलेली असतात दहशतवादाची बीजं... मग घडतात बॉम्बस्फोटासारखी घटितं

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं


* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books




# पुरस्कार

## अरुंधती रॉय यांना पेन पिंटर पुरस्कार जाहीर

पुणे - उत्कृष्ट साहित्यिक गुणवत्ता असलेल्या लेखकाला दरवर्षी देण्यात येणारा पेन पिंटर पुरस्कार या वर्षी लेखिका अरुंधती रॉय यांना जाहीर झाला आहे. नाटककार हॅरॉल्ड पिंटर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार देण्यात येतो. सलमान रश्दी, कॅरोल डफी यांच्यासारख्या वैशिष्ट्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखकांना यापूर्वी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. १० ऑक्टोबर रोजी या पुरस्काराचं वितरण करण्यात येईल. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे अरुंधती रॉय यांचं मन:पूर्वक अभिनंदन!

## भारत सासणे आणि देविदास सौदागर साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी

पुणे - या वर्षीचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले असून, ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे बालसाहित्यासाठीच्या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. त्यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीसाठी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तर देविदास सौदागर त्यांच्या 'उसवण' या कादंबरीसाठी युवा पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.  मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे या दोन्ही पुरस्कारार्थींचं मन:पूर्वक अभिनंदन!

## डॉ. देविदास तारु डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित

पुणे - संत गाडगे महाराज विचार मंच, ओतूर, आणि ज्ञानज्योत फाउन्डेशन, मांजरी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध साहित्यकृतींना पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यात डॉ. देविदास तारु यांच्या 'आता मव्हं काय' या आत्मकथनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त झाला. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेत २३ जून रोजी झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात तारु यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. तारु यांच्या आत्मकथनाला मिळालेला हा पंधरावा पुरस्कार आहे. डॉ. देविदास तारु यांचं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन!

## तितिक्षा कलासाहित्य आणि आणि कविसंमेलन पार पडले

पुणे - तितिक्षा इन्टरनॅशनल, पुणे यांच्या विद्यमाने कोल्हापुरात तितिक्षा कलासाहित्य आणि कविसंमेलनाचे आयोजन जून महिन्यात करण्यात आले होते. अभिनेत्री छाया सांगावकर या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. अभिनेता स्वप्निल राजशेखर, नाट्य दिग्दर्शक सतीश इंदापूरकर यांची सन्माननीय उपस्थिती या संमेलनाला लाभली. तर चित्रपट निर्माता-दिग्दर्शक सतीश रणदिवे, अभिनेत्री शर्वरी जोग इ. मान्यवरही या संमेलनाचे विशेष अतिथी होते. कोल्हापुरातील हॉटेल अयोध्यामध्ये हे संमेलन पार पडले.

◆



## प्रकाशन

### ‘शाहू महाराजांच्या आठवणी’ पुस्तकाचे प्रकाशन

आपल्या प्रगतिशील विचारांनी महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला समृद्ध करणारे राजर्षी शाहू महाराज यांच्या आठवणींची दिल्लीतील महाराष्ट्र सदनात उजळणी झाली. लोकराजा राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त मेहता पब्लिशिंग हाऊसने बरीच वर्षे उपलब्ध नसणारे भाई माधवराव बागल लिखित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित ‘शाहू महाराजांच्या आठवणी’ पुस्तकाची सुधारित आवृत्ती प्रकाशित केली. खासदार छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

राज्यभर राजर्षी शाहू महाराजांना १५०व्या जयंतीनिमित्त मानवंदना दिली जात आहे. महाराजांच्या दूरदृष्टीचा आणि प्रगतिशील विचारांचा डंका राजधानी दिल्लीतही वाजला. निमित्त होते, ‘शाहू महाराजांच्या आठवणी’ पुस्तकाच्या प्रकाशनाचे. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात शाहू महाराजांच्या जयंतीचा मुहूर्त साधत खासदार छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते हे प्रकाशन झाले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता व साहिल मेहता या वेळी उपस्थित होते.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी प्रकाशित केलेली ‘शाहू महाराजांच्या आठवणी’ या पुस्तकाची ही सुधारित आवृत्ती असून याआधी हे पुस्तक बरीच वर्षे बाजारात उपलब्ध नव्हते.

राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांचा सहवास लाभलेल्या समकालीन लोकांनी ज्या आठवणी सांगितल्या आणि त्याचे संकलन भाई माधवराव बागल यांनी केले होते, त्या पुस्तकाची इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादन केलेली सुधारित आवृत्ती आता वाचकांसाठी उपलब्ध झाली आहे. या पुस्तकातील शाहूकालीन सांस्कृतिक, सामाजिक घटना व त्याचे झालेले दूरगामी परिणाम याचा आढावा असणारा हा महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून आपल्याला या पुस्तकाकडे पाहता येईल.

## ‘अनुवादातून अनुसर्जनाकडे’ पुस्तकाचे प्रकाशन

लीना सोहोनी लिखित ‘अनुवादातून अनुसर्जनाकडे’ या मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील आणि ज्येष्ठ समीक्षक रणधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती या प्रकाशन सोहळ्याला लाभली.

‘अनुवादकांची मायमराठीत मोठी परंपरा आहे. अनुवादाच्या माध्यमातून दोन भाषांचा संगम करणाऱ्या अनुवादकांनाही पद्मश्री मिळायला हवा,’ अशी अपेक्षा ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांनी या वेळी व्यक्त केली.

मराठी साहित्यातील अनुवादित साहित्याचं महत्त्व विश्वास पाटील यांनी या वेळी स्पष्ट केलं. ते म्हणाले, ‘देस्तायवस्की आणि टॉलस्टाय जगापर्यंत पोहोचवण्याचं काम अनुवादाने केलं.’

‘लेखक मोठा असला म्हणून पुस्तक मोठं होत नाही, तर त्या पुस्तकात ती ताकद असेल तरच ते पोचतं. तेच अनुवादाच्या बाबतीत लागू होतं. बहुजनांची भाषा अनुवादकाला माहीत असावी लागते, त्याशिवाय भाषांतरे सिद्ध होत नाहीत,’ असंही पाटील या वेळी म्हणाले.

या वेळी रणधीर शिंदे यांनी मराठी साहित्यातील अनुवादाची परंपरा आणि महत्त्व विशद केले. ते म्हणाले, ‘मराठी भाषेचे पांग फेडण्यासाठी लीना सोहोनी यांनी आपले आत्मकथन लिहिले आहे असे जाणवते. अनुवादाला आपल्या संस्कृतीत दुय्यम स्थान दिलं जातं; पण फुटकळ साहित्य लिहिण्यापेक्षा एखादं पुस्तक अनुवादित केलेलं चांगलं.’

अनुवाद हा परकायाप्रवेश असतो आणि तो करताना अनुवादक कसा

जखडून गेलेला असतो, याचा प्रत्यय या पुस्तकातून येत असल्याचे रणधीर शिंदे म्हणाले.


नवं जग हे मशीन अनुवादाचं भयंकर जग आहे, त्यामुळे वर्षानुवर्षे झटून अनुवाद करणं हे फार मोलाचं असल्याचंही ते म्हणाले.

लेखकाला लिहिताना मुक्त स्वातंत्र्य असतं; पण अनुवादकाला असं करता येत नाही. शब्दाला प्रतिशब्द न देता त्याला अनुसर्जन करावं लागतं, त्यामुळे अनुवादाचं कामही सर्जनाचं काम असल्याचं लीना सोहोनी यांनी सांगितलं. प्रकाशक अखिल मेहता उपस्थित होते. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात हा कार्यक्रम पार पडला.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**




**महादेव मोरे**

भरकटलेली आन्शी शिरली 'आडगारात'...
तिच्या जीवनाची मग झाली वाताहत

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# द हिडन हिंदू




**अक्षत गुप्ता**


अनुवाद

**मुक्ता देशपांडे**

देशभरातील वाचकांवर मोहिनी घालणाऱ्या, अल्पावधीत बेस्टसेलर ठरलेल्या 'द हिडन हिंदू' मालिकेचा पहिला भाग आता मराठीत

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# द स्टोरीज वी टेल





**देवदत्त पट्टनायक**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

मिथक कथा, त्यांचं वास्तव आणि समकालीन जीवनाचे संदर्भ यांची अनाहूत सांगड असलेलं, जगभराच्या मिथक कथांवर प्रकाश टाकणारं पुस्तक...

**किंमत : २७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# कालचक्राचे रक्षक

**अश्विन सांघी**

अनुवाद
**संकेत दि. लाड**

*कालचक्राचा रहस्यमय इतिहास आणि*
*बौद्ध अध्यात्म्याची उजळणी करण्यात धर्मवादावर उपाय*
*शोधणारी दर्जेदार कादंबरी*

जमिनीवर पडलेली ती तरुण व्यक्ती कसाबसा आपला डावा हात उजव्या हातापर्यंत नेण्याचा प्रयत्न करत होती. ती व्यक्ती एखाद्या जखमी जनावरासारखी ओरडत होती. डब्ल्यूएचएमयू म्हणजे व्हाईट हाऊस मेडिकल युनिटचे अधिकारी आणि सिक्रेट सर्व्हिसेसच्या एजन्ट्सनी त्या व्यक्तीभोवती कोंडाळं केलं होतं. खुद्द प्रेसिडेंट

तिथेच काही अंतरावर निश्चल उभे होते. व्हाईट हाऊसमध्ये स्टेट डिनरसाठी आलेल्या आणि घडला प्रकार पाहून डोळे विस्फारणाऱ्या आमंत्रितांना शक्य तितक्या शांतपणे स्टेट डायनिंग रूममधून शेजारच्या रेड रूममध्ये पाठवण्यात आलं होतं. सहाय्यक कर्मचारी त्यांच्याकडून शक्य ती सगळी मदत करत होते, पण नेमकं काय चाललंय हे कोणालाच माहीत नव्हतं. सगळ्याची गोळाबेरीज म्हणून ते इतकंच सांगू शकत होते की कॅनडाचे पंतप्रधान जीन बेलांजर अत्यवस्थ होते.

बेलांजरना खोकला आल्यामुळे एका मेडिकने त्यांच्या तोंडावर कापसाचा बोळा धरला. त्यांच्या लाळेतून रक्त येत होतं. त्या अर्धवट बेशुद्धीच्या अवस्थेतसुद्धा बेलांजरना डावा हात खाजविण्याची आणि हाताची त्वचा खेचून काढण्याची अनावर इच्छा होत होती. त्यांना सगळा त्रास बहुतेक त्या हातामुळेच होत होता. त्यामुळे, मेडिकल टीममधल्या एका नर्सने झटकन त्यांचं जॅकेट आणि शर्ट कापून बाजूला काढला आणि तो हात मोकळा केला; आणि तेव्हाच त्यांना ते दिसलं.

सुजल्यामुळे आकाराने दुसऱ्या हातापेक्षा दुप्पट झालेल्या त्या हाताला लालसर काळा रंग चढला होता. संपूर्ण हातावर लालसर शेंदरी रंगाचे फोड आले होते आणि त्यातून रक्ताचं नि पाण्यासारख्या द्रवाचं एक विचित्र मिश्रण बाहेर पडत होतं.

''मला वाटतं त्यांच्यावर विषप्रयोग झालाय,'' डब्ल्यूएचएमयूचे संचालक म्हणाले. प्रेसिडेंटचे फिजिशियन म्हणूनही त्यांची नेमणूक झाली होती. ते म्हणाले, ''आपल्याकडे वेळ नाहीये. त्यांचे हृदयाचे ठोके वेगाने कमी होताहेत!''

परवानगी मिळताच त्या संचालकांचा सहाय्यक घाईघाईने तिथे डेफिब्रिलेटर घेऊन आला. ''दोनशे जौल्सवर चार्ज कर तो,'' संचालकांनी आदेश दिला.

''हो, सर,'' असं म्हणत तो सहाय्यक बेलांजरशेजारी गुडघे टेकवत फरशीवर बसला. त्याने बेलांजरच्या छातीवर वरच्या बाजूला, गळ्याच्या हाडाखाली उजवीकडे एक आणि छातीवर डावीकडे खालच्या बाजूस एक असे दोन जेल पॅड्स लावले. जेल पॅड्सवर जोराने पॅडल्स दाबत त्याने पंचवीस पौंड इतका दाब लावला.

पॅडल्सवरचं शॉक बटन दाबत तो मोठ्याने ओरडला, ''ऑल क्लीअर!'' शरीरातून करंट गेल्याने बेलांजरच्या शरीराला हिसका बसला. हृदयाचे ठोके स्थिर असतील या आशेने संचालकांनी मॉनिटरकडे पाहिलं.

आणि त्याच वेळेस बेलांजरने उलटी केली. त्याच्या ट्युक्सेडोवर काही शिंतोडे उडले आणि हळूहळू गालिचाच्या ढिगाऱ्यापर्यंतही त्याचा ओघळ गेला. स्टेट डायनिंग रूममधला तो फिकट निळा गालिचा तिथे बाजूलाच गोळा करून ठेवलेला होता. ''आपण लगेच त्यांना बेथेस्दामध्ये हलवलं पाहिजे,'' संचालकांनी म्हटलं. त्यांनी प्रेसिडेंटच्या संमतीसाठी त्यांच्याकडे एक चोरटी नजर टाकली. प्रेसिडेंटनी काही न बोलता मान हलवली.

काही सेकंदातच साउथ लॉनमधल्या हेलिपॅडवर हवाईदलाचं चॉपर उतरलं आणि बेलांजरना त्यात ठेवलं गेलं. त्यांना आत ठेवत असतानाच संचालकांना आणखी एक लक्षण दिसलं.

बेलांजरचा चेहराही त्यांच्या हातासारखाच प्रचंड सुजला होता, पण उजव्या बाजूला. चेहरा इतका फुगलेला होता की उजवा डोळाही दिसत नव्हता. बाकीच्या मेडिक्सबरोबर संचालक चटकन हेलिकॉप्टरमध्ये शिरले. काही अंतरावर त्यांना बायो-हझार्ड सूट्स घातलेली काही माणसं हिरवळीवरून व्हाईट हाऊसच्या दिशेने धावताना दिसली. तिथला काही भाग निर्जंतुक करण्यासाठी ते लोक क्लोरिन डायऑक्साईडचे कॅनिस्टर्स घेऊन चालले होते. तिथे अँथ्रॅक्स वापरलं गेल्याची शक्यता गृहीत धरणं त्यांच्यासाठी आवश्यक होतं. मळमळ, फोड, सूज आणि श्वास लागणं यासारखी बेलांजरमध्ये दिसलेली लक्षणं अँथ्रॅक्स विषप्रयोगासारखीच होती. पण त्याबद्दल कोणालाच खात्री नव्हती.

चॉपर हवेत झेपावत असताना खिडकीतून संचालकांची नजर प्रेसिडेंटकडे गेली. पांढऱ्या टायसह पोशाख केलेले प्रेसिडेंट साऊथ लॉनवर उभे होते आणि त्यांचे काळेभोर केस फिरत्या रोटर्सच्या वाऱ्याने अस्ताव्यस्त उडत होते.

हवेत झेपावणाऱ्या हेलिकॉप्टरकडे त्यांचं अगदी बारीक लक्ष होतं.

वेस्ट विंगमध्ये बेलांजर येण्याआधीचे २४ तास अत्यंत धांदलीचे होते. प्रेसिडेंटनी त्यांच्या नेहमीच्या शिरस्त्यानुसार हा अधिकृत कार्यक्रम

रद्द व्हावा अशी इच्छा व्यक्ती केली होती. ‘‘जग गेलं उडत. मी प्रेसिडेंट आहे यूएसएचा आणि मला हवं ते मी करू शकतो. मग त्यात अनेक आठवड्यांपूर्वी ठरलेलं स्टेट डीनर रद्द करणंही येतं.’’ हे जाहीर करण्याची त्यांची ही पद्धत होती.

प्रेसिडेंटनी जेमतेम महिन्याभरापूर्वीच कार्यभार स्वीकारला होता; आणि तो महिना अतिशय वादळी ठरला होता. अर्थात त्यांच्या समर्थकांपैकी कोणालाच यापेक्षा वेगळं काही घडणं अपेक्षित नव्हतं. त्यांच्या वलयामुळे प्रभावित झालेल्या काही मोजक्या लोकांना मात्र जिंकल्यानंतर त्यांच्या कार्यपद्धतीत काही बदल होतील अशी अपेक्षा होती.

‘‘मी का भेटतोय या दयामूर्तीला?’’ आपल्या ओव्हल ऑफिसमध्ये ऐटीत येरझाऱ्या घालत त्यांनी विचारलं होतं. त्यांनी साठीतही उत्तम राखलेली तब्येत, कपड्यांच्या बाबतीतली टापटीप आणि तयार होण्यातला त्यांचा नीटनेटकेपणा पाहण्यासारखा होता. आखीवरेखीव चेहरा आणि सडपातळ शरीरयष्टीमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रकारचा बेरकीपणा जाणवायचा, विशेषतः वाचन करताना ते चष्मा नाकावर ठेवायचे तेव्हा. पण मग असं बेरकीपणाचं वागणं राजकारणात फायद्याचं ठरू शकतं.

‘‘मिस्टर प्रेसिडेंट, बेलांजरशी सामोपचाराने वागलात आणि त्यांच्याशी हातमिळवणी केलीत तर तुमच्या कार्यकारी कारवाया जास्त विश्वासार्ह ठरतील,’’ सेक्रेटरी ऑफ स्टेटने उत्तर दिलं. सध्याचा कारभार सुरू होऊन जेमतेम ३० दिवस लोटले होते आणि तेवढ्यातले हे दुसरे सेक्रेटरी ऑफ स्टेट होते. पहिल्या सेक्रेटरीला प्रेसिडेंटनी दहा दिवसांतच बडतर्फ केलं होतं. आपल्या बाबतीतही हे घडू शकतं याची सध्याच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटला पूर्ण कल्पना होती. त्यामुळे, ठरलेला अधिकृत कार्यक्रम आहे तसा राहू देणं किती गरजेचं आहे ते प्रेसिडेंटना पटवून देण्यासाठी त्यांनी शक्य ते सगळे प्रयत्न केले होते.

‘‘माझ्या मतदारांना माझ्या विश्वासार्हतेचे आणखी पुरावे देणं गरजेचं नाहीये,’’ प्रेसिडेंटनी पलटवार केला. ‘‘मला त्रास देणारी डाव्या विचारसरणीची प्रसारमाध्यमं आणि खोट्या बातम्या पेरणाऱ्या नीच लोकांनाच फक्त गरज आहे त्याची. त्यांना बाकीचे उद्योग आहेत की नाही देवालाच ठाऊक.’’

स्वतःच्या मतांवर ते ठाम होते. मतदानाबद्दल भाकितं करणारे आणि प्रसारमाध्यमांतल्या सगळ्या तज्ज्ञांनी केलेली सगळी विरोधी भाकितं खोटी ठरवत निवडणूक जिंकणारा माणूस होता तो. त्या सगळ्यांनाच त्यांनी वेड्यात काढलं होतं. ते उद्धट होते, उद्दाम होते आणि राजकीय दृष्ट्या चुकीचे होते. पण नेमक्या याच कारणांमुळे ते जिंकले होते.

कारभार हातात घेतल्यानंतरच्या पहिल्याच महिन्यात त्यांनी मुस्लीम लोकांच्या स्थलांतरावर अंकुश लावला होता, संरक्षण व्यवस्थेचा खर्च दुप्पट केला होता, हवामान बदलाची भाकितं निकालात काढली होती, आंतरराष्ट्रीय संबंधाचा आढावा घेऊन त्यात बदल केले होते, कर कमी करण्यासाठी पावलं उचलली होती आणि त्यांच्या मार्गात येणाऱ्या अनेकांना कामावरून दूर केलं होतं.

ते त्यांच्या वागण्यातून शत्रू निर्माण करताहेत याकडे लक्ष वेधत चिंता व्यक्त केली गेली तेव्हा प्रेसिडेंटचं उत्तर असं होतं, ''चर्चिल एकदा असं म्हणाले होते की तुम्हाला जर शत्रू असतील तर त्याचा अर्थ तुम्ही कधीतरी तुमच्या आयुष्यात काहीतरी योग्य मुद्दा घेऊन उभे ठाकले आहात.''

''पण तुमच्याकडे चार वर्षं आहेत प्रेसिडेंट म्हणून काम करण्यासाठी,'' सेक्रेटरी ऑफ स्टेटनी युक्तिवाद केला, ''शत्रू निर्माण करण्यासाठी भरपूर आहे हा वेळ. मग इतका उतावळेपणा कशासाठी?'' असं बोलून त्यांनी जीभ चावली. आपण जास्तच बोलून गेलो अशी भीती त्यांना वाटली.

''सगळं मार्गी लावण्यासाठी मला चार वर्षांची गरज नाहीये,'' प्रेसिडेंट ठामपणे म्हणाले. ''जेमतेम एक वर्ष. त्या एक वर्षात मी आधीच्या अध्यक्षांनी घातलेला सगळा गोंधळ निस्तरलेला असेल. त्यावेळेस, कोणालाही काही पटवून देण्याची गरज उरणार नाही.''

''आणि त्यासाठीच कॅनडाचे पंतप्रधान तुमच्या बाजूने असणं गरजेचं आहे,'' सेक्रेटरी ऑफ स्टेटनी समजावलं. ''तुम्ही खूपच उजव्या विचारसरणीचे आहात असं समजलं जातं आणि त्यामुळे बरेचजण तुमच्या विरोधात आहेत. लोकप्रियतेच्या निकषांवर तुमच्याशी बरोबरी करू शकेल अशी हीच एक व्यक्ती आहे, जीन बेलांजर. ते कॅनडाचे आतापर्यंतचे सगळ्यात तरुण पंतप्रधान आहेत. त्यांचं व्यक्तिमत्त्वही आकर्षक आहे–जगभरातल्या

स्त्रिया जीव ओवाळून टाकताहेत त्यांच्यावर. तुम्हाला खूप मोठी प्रसिद्धी मिळेल यातून.''

''ते ज्या मुद्द्यांचा आग्रह धरतात ते नाहीत आवडत मला,'' प्रेसिडेंटनी त्यांचे व्यवस्थित भांग पाडून बसविलेले काळे केस नीट केले. बेलांजर आपल्यापेक्षा दिसायला खूप उजवे आहेत, हे त्यांना माहीत होतं. त्यामुळे त्याच्याशेजारी उभे राहिल्यानंतर आपण इतरांच्या नजरेत डावं ठरावं ही कल्पना त्यांना मान्य नव्हती. ते लगेच एखादा आक्रमक मुद्दा शोधू लागले आणि त्यांना तो मिळाला. ''स्थलांतर आणि दहशतवादाच्या बाबतीत मवाळ भूमिका आहे त्याची. मूर्ख आदर्शवादी माणूस आहे तो,'' ते समाधानाने म्हणाले.

''मला माहीत आहे, पण तुम्हाला गरज आहे त्यांची.''

''का?''

''कारण, जागतिक स्तरावर उदारमतवादी डाव्या विचारसरणीचे ते एकटेच उरलेत. बाकीचे सगळेजण एकतर काही संबंध नसल्यासारखे दिसतात किंवा मग...''

''किंवा?'' प्रेसिडेंटनी थंडपणे विचारलं.

''मेलेले आहेत.''

व्हाईट हाऊसच्या स्टेट फ्लोअरवरील दोन बँक्वेट हॉल्समध्ये स्टेट डायनिंग रूम मोठी होती. आधीच्या फर्स्ट लेडीने जातीने लक्ष घालून त्या दालनाचं नूतनीकरण करून घेतलं होतं. तिथल्या छताच्या नक्षीकामाला साजेसं बाराशे चौरस फूट इतकं प्रचंड मोठं कारपेट तिथे अंथरलं गेलं होतं. खरंतर त्या दालनात एकशेचाळीस लोकांना बसता येईल इतकं ते दालन मोठं होतं पण बेलांजरसाठी आयोजित केलेलं डिनर फक्त चौतीस पाहुण्यांसाठीच होतं. आमंत्रितांची यादी काही निवडक राजनीतिज्ञ, कॅबिनेट मंत्रिमंडळाचे काही सदस्य, सिनेटर्स आणि कायदेमंडळाच्या सदस्यांपुरती मर्यादित असावी असा निर्णय प्रेसिडेंटनी घेतला होता.

ब्लेअर हाऊसमधून निघालेला मोटारींचा ताफा बेलांजरना घेऊन आला. नॉर्थ पोर्टिकोमध्ये प्रेसिडेंट त्यांच्या पत्नीसह उभे होते. त्यांची पत्नी म्हणजे खानदान आणि राजकीय क्षेत्रात योग्य ठरेल अशी जोडीदार

होती. पंतप्रधान जीन बेलांजर आणि साधी तरी आकर्षक वेशभूषा केलेल्या त्यांच्या पत्नीचं स्वागत करण्यासाठी हे फर्स्ट कपल तिथे प्रतीक्षा करत होतं. औपचारिक स्वागत आणि छायाचित्रांसाठीचा लखलखाट वगैरे थोडक्यात पार पडल्यानंतर या दुसऱ्या फर्स्ट कपलला स्वागतसमारंभासाठी यलो ओव्हल रूममध्ये नेण्यात आलं.

स्वागत समारंभ संपला आणि दोन्हीही दंपती एका मोठ्या जिन्याच्या दिशेने चालत आले, जिथे युनायटेड स्टेट्स मरीन बँड त्यांचे लक्ष वेधून घेत होता. नंतरचा कार्यक्रम ठरलेला होता: हेल टू द चीफ या अध्यक्षीय गीतानंतर कॅनडाचे राष्ट्रगान ओ कॅनडा आणि शेवटी स्टार स्पँगल्ड बॅनर हे राष्ट्रगान वाजविलं गेलं. शेवटी, ते सगळे जण स्टेट डायनिंग रूममधल्या क्रॉस हॉलच्या दिशेने निघाले. तिथे त्यांच्यासाठी फाईव्ह कोर्स मिल तयार ठेवण्यात आलं होतं.

स्वागताचे चार शब्द बोलण्यासाठी प्रेसिडेंट उभे राहिले. त्यांच्या कर्मचाऱ्यांनी मेहनतीने तयार केलेलं लेखी भाषण त्यांनी नेहमीप्रमाणे बाजूला ठेवलं. रूढ पद्धत सोडून वेगळं वागायचं ही त्यांची नेहमीची पद्धत होती. पण खरी समस्या ही होती की त्यांच्या उत्स्फूर्त वक्तव्यातून ते नेहमी संकट ओढवून घ्यायचे. जणू काही ते स्वतःच स्वतःसाठी स्फोटकं जमा करत असत.

तरीही, आजचा दिवस वेगळा होता. आज ते एखाद्या आज्ञाधारक शाळकरी मुलासारखे वागत होते. लेखी भाषण जरी त्यांनी बाजूला ठेवलेलं असलं तरी वादग्रस्त ठरेल असं कुठलंही विधान त्यांनी केलं नाही. ''आणि शेवटी मला असं म्हणावंसं वाटतं की पंतप्रधान बेलांजर आणि त्यांची पत्नी यांनी आमची भेट घेऊन आम्हा पती-पत्नीचा फार मोठा सन्मान केला आहे. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि कॅनडा या देशांमध्ये ऐक्य आहे. आमची ही मैत्री आणखी मजबूत होईल आणि कायम राहिल.'' टाळ्यांचा कडकडाट झाला. पण त्या टाळ्यांमागे त्यांच्या भाषणात काहीही वादग्रस्त नव्हतं हा दिलासा जास्त होता.

त्यानंतर जीन बेलांजर बोलण्यासाठी उभे राहिले. ''मिस्टर प्रेसिडेंट, आम्हाला सुखावणाऱ्या या स्वागतासाठी तुमचे आभार. मी खुल्या दिलाचा

माणूस आहे. लोकशाही मूल्ये, भाषणस्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानतेवर माझा विश्वास आहे. कुठलाही, पंथ, धर्म किंवा लिंगभावाच्या आधारे कुठल्याही व्यक्तीच्या बाबतीत पक्षपात केला जाऊ नये असं मला वाटतं.''

ते काही क्षण थांबले. श्रोत्यांना वाटलं की शब्दांची जुळवाजुळव करण्यासाठी त्यांना थोडा वेळ हवा असेल. समोर ठेवलेला पाण्याचा ग्लास बेलांजरनी थरथरत्या हातांनी उचलला. थोडेसे अडखळत ते पुढे बोलू लागले, ''प-पण आपल्याला त्रास देणारं असंही काहीतरी घडत आहे. आपण सगळेच याबाबत सहमत आहोत. की-की आपण एका भयंकर जगात राहत आहोत. असं जग जिथे दररोज अनेक निष्पाप जीव मृत्यूमुखी पडत आहेत. आपल्या पुढच्या पिढीसाठी एक सुंदर आणि सुरक्षित जग मागे ठेवून जाण्याचा संकल्प आपण सर्वांनी मिळून करायला हवा...''

त्यांच्या चेहऱ्यावर दरदरून घाम फुटलेला दिसत होता. डोळे पांढरे पडले होते आणि डोळ्यांची बुबुळं गरगरा फिरत असल्यासारखी दिसत होती. ते थोडेसे मागे झुकले आणि मग मागच्या मागे कोसळले. पडत असताना खुर्ची बाजूला फेकली गेली आणि ते खाली आपटले. ते पाहून जमलेल्या सगळ्या अतिथींचे श्वास रोखले गेले.


सुदैवाने, पूर्वीच्या फर्स्ट लेडीने तिथे घालून घेतलेल्या त्या ठिपक्याठिपक्यांच्या निळ्या गालिचाने त्यांना अलगद झेललं.

मेरीलँड बेथेस्दामधल्या वॉल्टर रीड नॅशनल मिलिटरी मेडिकल सेंटरमध्ये बरीच वर्दळ होती. तिथे नुकत्याच दाखल झालेल्या रुग्णाचं महत्त्व लक्षात घेता ते साहजिकच होतं. यापूर्वी अनेक प्रसिद्ध व्यक्तींनी तिथे उपचार घेतल्यामुळे त्या रुग्णालयाला लौकिक प्राप्त झाला होता. तिथल्या कर्मचाऱ्यांनाही तिथे अशा बड्या मंडळींच्या येण्याची सवय झाली होती. जॉन एफ केनेडींच्या हत्येनंतर त्यांना तातडीने तिथेच दाखल केलं गेलं होतं. रोनाल्ड रीगन यांच्या प्रोस्टेट कॅन्सरसाठी त्यांच्यावर वॉल्टर रीडमध्ये शस्त्रक्रिया केली गेली होती.

◆



## पुस्तकाच्या पानांतून




# उजळे जगण्याचा दीप

**सेरदार ओस्कान**

अनुवाद

**अजित व्यं. कुलकर्णी**

*खुसखुशीत छोट्या-छोट्या गोष्टीतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान*

त्या म्हाताऱ्याचा शोध सुरूच होता. तो ज्या मुलाला शोधत होता, ते त्याला समुद्रकिनाऱ्यालगतच्या त्या गावातही सापडलं नाही.

एजियन समुद्राच्या (ग्रीसच्या पूर्वेस असलेला भूमध्य सागराचा एक भाग) एका शांत कोपऱ्यात एकमेकास लगटून सात सुंदर बेटं वसली आहेत. तो म्हातारा ज्या गावातून बाहेर पडणार होता, ते गाव तिथल्या एकोणीस गावांपैकी एक होतं. तिथून त्या सुंदर बेटांचं दर्शन घडत होतं. त्या एकोणीस गावांपैकी सोळाव्या गावाला भेट

देऊन तो नुकताच निघाला होता.

ते बालक त्या सात बेटांच्या जवळपासच कुठेतरी असल्याची चिन्हे त्या म्हाताऱ्याला दिसत होती. म्हणूनच गेल्या काही महिन्यांपासून त्या बेटांवरील रस्ते धुंडाळत तो फिरत होता आणि त्याच्या भोवती जमणाऱ्या शेकडो मुलांना एकच प्रश्न वारंवार विचारत होता.

प्रत्येक गावाच्या भेटीत तो एकच गोष्ट पुन्हा पुन्हा करत असे. गावात पोचल्यावर तो प्रथम बदामाच्या आकाराचे आरसे चिकटवलेला पांढरा शुभ्र सदरा घालायचा. तो गावात फिरू लागला की सूर्यप्रकाशात ते आरसे चमकू लागत आणि मग गावातली पोरं त्याच्या भोवती जमू लागायची. मग एक शांत कोपरा निवडून तो तिथं बसत असे. पिशवीतून सात दगडगोटे काढून ते आपल्या समोर एका ओळीत तो मांडून ठेवी.

आणि मग त्या दगडगोट्यांना नेहमीचाच प्रश्न विचारी, ''माझ्या प्रिय दगडांनो, त्या 'अमर्त्य' तत्त्वांची गोष्ट आज मी तुम्हाला पुन्हा सांगू का?'' जणूकाही खरंच त्याला त्या प्रश्नाचे उत्तर मिळणार असल्याचा आविर्भाव करत तो काही क्षण थांबत असे आणि मग म्हणे, ''ठीक आहे, मग ऐका तर.''

''प्रिय दगडांनो, ही लाखो वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. खूप खूप दूर असलेल्या 'शाश्वत' आणि 'अमर्त्य' अशा एका प्रकाशमय जगात राहाणारे ते चिरंजीव लोक एकदा आपल्या ग्रहाला भेट द्यायला आले. तेव्हा तुम्ही दगड नव्हतात, खंड खंड नव्हते, समुद्र समुद्र नव्हते. तेजोमय जगातल्या काही अमर्त्य गोष्टी तेव्हा आपल्या जगाच्या भेटीस आल्या होत्या. 'सौंदर्य,' 'स्वातंत्र्य,' 'संपत्ती,' 'सत्ता,' 'तर्क' हे त्या अमर्त्यांपैकी काही. यामध्ये सर्वांत शेवटी आला तो 'आनंद.' त्या आनंदाला अनेक हात होते. आपल्या पृथ्वीवर पोचल्यावर ही सर्व मंडळी 'आनंदा'चा एक एक हात धरून या पृथ्वीतलावर मजेने संचार करू लागली.

''काही काळ असाच गेल्यावर त्यांची भेट झाली मृत्युदूताशी. हा मृत्युदूत त्यांच्या कितीतरी आधीच पृथ्वीवर येऊन पोचला होता. लवकरच त्यांच्या लक्षात आलं की या जगात सर्व काही मर्त्य आणि अशाश्वत आहे. त्या मृत्युदूताची मग त्यांना भीती वाटू लागली आणि मग एका पाठोपाठ एक असे ते सर्वजण आपल्या तेजोमय जगात परत निघून गेले. खरंतर ते सर्वजण अमर असल्यानं त्यांना मृत्युदूताला घाबरण्याचं काहीच कारण नव्हतं. तो त्यांना काहीच इजा करू शकला नसता. पण त्यांनी मग

‘तर्क’ नावाच्या चिरंजीवाचा सल्ला घेतला. तर्कानं मात्र त्या सर्वांना सावधपणे वागायला सांगितलं.

“ज्या चिरंजीवाने तर्काचा सल्ला ऐकून सर्वप्रथम या जगाचा निरोप घेतला तो होता ‘आनंद’. म्हणूनच प्रत्येक आनंद हा काळाच्या प्रवाहात हळूहळू लुप्त होतो. तो जेव्हा पृथ्वीवर मुक्तपणे भटकत होता तेव्हा त्यानं एक सुगंध मागे सोडला. काही काळानं सौंदर्य, संपत्ती, स्वातंत्र्य या अमर्त्यांनीही या जगाचा निरोप घेतला, पण आपला सुगंध मागे ठेवून!

“म्हणूनच आपल्या जगात या सर्व अमर्त्य तत्त्वांनी मागे सोडलेल्या सुगंधांप्रमाणे सर्व प्रकारचे सौंदर्य, सर्व प्रकारचे तर्क, सर्व प्रकारची संपत्ती, स्वातंत्र्य आणि सर्व प्रकारचे आनंद हळूहळू लुप्त होतात.

“पण माझ्या प्रिय दगडांनो, जरी हे सर्व अमर्त्य त्या मृत्युदूताला घाबरले असले तरी त्यातला एकजण मात्र त्या मृत्युदूताच्या चक्क प्रेमात पडला आणि त्याने हे जग सोडून जायला नकार दिला.

“आणि माझ्या प्रिय दगडांनो, आता मी तुम्हाला जे काही सांगणार आहे ते लक्षपूर्वक ऐका, कारण तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. ‘तो’ चिरंजीव गृहस्थ आजही इथं आहे. तो या पृथ्वीवर मुक्तपणे संचार करतोय आणि तो ज्या ज्या गोष्टीला स्पर्श करतोय ती ती शाश्वत होतेय. ज्या जगात सर्व काही ‘अशाश्वत’ आहे ते आपण त्याच्या साहाय्याने ‘शाश्वत’ बनवू शकतो. कारण त्याच्या हातात अमरत्वाचं रहस्य दडलं आहे. तुम्ही जर त्याला शोधू शकलात, तर माझ्या प्रिय दगडांनो, तुम्ही प्रथम दिव्य अशा जलात आणि मग प्रकाशात न्हाऊन निघाल आणि उद्याची पहाट उगवायच्या आत तुमच्या असे लक्षात येईल की तुम्हीही ‘चिरंजीव’ झाला आहात, ‘अमर’ झाला आहात.

“आणि म्हणून माझ्या अमूल्य मित्रांनो, ‘तो’ अमर्त्य कोण आहे हे जर तुम्हाला जाणून घ्यायचे असेल, तर मला तुम्हाला त्या दोन जिवलग मित्रांची गोष्ट सांगावी लागेल... असे दोन मित्र जे मनाने एकच होते. ही गोष्ट या जगातच घडली, पण ही गोष्ट या जगाची मात्र नव्हे बरं...”

बऱ्याचदा त्याचं त्या दगडांबरोबरचं असं स्वगत तासन्‌तास चालायचं, अगदी आसपासची सर्व मुलं एकत्र जमल्याची त्याची खात्री होईपर्यंत. मग आपल्या गळ्यातल्या माळेतला बदामाच्या आकाराचा आरसा हातात धरून तो विशिष्ट दिशेला फिरवत असे, जेणेकरून परावर्तित सूर्यकिरण त्या

मुलांच्या चेहऱ्यावर पडतील. त्या प्रकाशात सर्व मुलांचे चेहरे तो निरखून पाही आणि ज्या प्रश्नाचं उत्तर तो सगळीकडे शोधत होता तो प्रश्न त्यांना विचारी, ''तुमच्यापैकी कुणी कधी डॉल्फिनशी गप्पा मारल्यात का रे?''

असा विचित्र प्रश्न ऐकून सगळ्यांना आश्चर्य वाटायचं. मग त्यांच्यापैकी काही मुलं हसायची, काही त्याच्याकडे उत्सुकतेनं बघत राहायची तर काही मुलं प्रतिप्रश्नांचा भडिमार करायची. क्वचित एखादाच मुलगा किंवा मुलगी आपण डॉल्फिनशी गप्पा मारल्यात असं सांगायची. असं उत्तर मिळाल्यावर मात्र त्याचे डोळे क्षणभर चमकायचे आणि मग तो तिला किंवा त्याला विचारी, त्या डॉल्फिनचं नाव काय होतं बरं?''

समाधानकारक उत्तर मिळालं नाही की त्याचा भ्रमनिरास होत असे. आपण त्यांच्यावर दाखवलेल्या अमूल्य अशा विश्वासाला तडा गेला असं त्याला वाटायचं. मग तो निराश, दु:खी होत असे. आता त्याची तब्येतही बरी नव्हती, तो खूप दमला होता. आपण आता फार काळ जगणार नाही हे त्याला माहीत होते. म्हणूनच त्याच्याजवळची ती 'आशेची संहिता' (The Book of Hope) एका नव्या विश्वस्ताकडे त्याला सुपुर्द करायची होती... खूप उशीर होण्यापूर्वी. तसं झाले नाही तर सर्वांना प्रतीक्षा असलेली शाश्वत शांतता कधीच येणार नव्हती...

ती 'आशेची संहिता' त्या म्हाताऱ्याकडे गेली अठ्याहत्तर वर्षे होती. तो नऊ वर्षांचा असताना त्याच्या आजोबांनी काळ्या चामड्याच्या वेष्टणात गुंडाळलेलं एक जुनं पुस्तक त्याला दाखवलं. ते म्हणाले, की बाबा रे, मी आता काही दिवसांचाच सोबती आहे आणि माझ्यानंतर हे पुस्तक तुला सांभाळायचे आहे. हे पुस्तक तू एखाद्या गुप्त ठिकाणी पुरून ठेव आणि माझ्या मृत्यूपर्यंत ते उघडून पाहू नकोस. त्या पुस्तकात जे काही लिहिले आहे ते तू कोणालाही सांगायचे नाहीस.

गोंधळून जाऊन त्याने आपल्या आजोबांना अनेक प्रश्न विचारले; पण त्यातल्या एकाही प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले नाही. ते एवढंच म्हणाले की तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरं त्या पुस्तकातच मिळतील.

पुढील काही दिवसांतच त्याच्या आजोबांचं निधन झालं. म्हणजे त्याला तसं इतरांकडून कळालं. मग आजोबांनी सांगितल्याप्रमाणं त्यानं गुप्त ठिकाणी गाडून ठेवलेलं ते पुस्तक बाहेर काढलं आणि वाचायला सुरुवात केली.

ते वाचताना त्याच्या लक्षात आलं की ते पुस्तक खूप पुरातन काळी

एका बालकानं लिहिलं होतं. त्या बालकाची चक्क देवदूतांशी मैत्री होती. पण त्या पुस्तकात त्याच्या लेखकाचं नाव किंवा ते कधी लिहिलं गेलं याचा काहीच उल्लेख नव्हता. जगातल्या प्रत्येक भाषेत त्या पुस्तकाची फक्त एकच प्रत उपलब्ध होती आणि ही गोष्ट ती भाषा जाणणाऱ्या फक्त एकाच व्यक्तीला माहीत होती. फक्त ते पुस्तक एका व्यक्तीकडून दुसरीकडं हस्तांतरित होतानाच ही गोष्ट दोन व्यक्तींना माहीत व्हायची.

ज्या नवीन व्यक्तीकडे ती आशेची संहिता जाणार असेल त्याला ती हस्तांतरित होण्याची वेळ पूर्वीच्या विश्वस्त व्यक्तीच्या मृत्यूच्या अगदी काही काळ आधीच माहीत व्हायची, कधी एखाद्या स्वप्नाद्वारे किंवा अन्य एखाद्या सांकेतिक मार्गानं. त्या आशेच्या संहितेचा नवीन मालक किंवा विश्वस्त कधी एखादा नातेवाईक असायचा तर कधी एखादी अनोळखी व्यक्ती, कधी गरीब तर कधी श्रीमंत, कधी स्त्री तर कधी पुरुष. पण एक गोष्ट मात्र निश्चित आणि आवश्यक होती... तो नवीन विश्वस्त एखादे बालकच असले पाहिजे.

ते पुस्तक होतं एका प्रकाशमय जगाकडं आणि अमरत्वाकडं जाण्याच्या प्रवासाचं. अमरत्वाचे रहस्य उकलू शकणाऱ्या स्त्री-पुरुषांची ती गोष्ट होती. 'तो' प्रेषित देवदूत कधी परतणार हेही त्या संहितेत लिहिलं होतं.

'त्या' प्रेषिताचा उल्लेख त्या पुस्तकात अनेक ठिकाणी होता. त्यात असं लिहिलं होतं की त्या आशेच्या संहितेचा अंतिम विश्वस्त म्हणजे प्रत्यक्ष देवदूतच असेल. त्या पुस्तकाचा शेवटचा सीलबंद भाग फक्त तोच उघडू शकेल. ज्या क्षणी तो उघडला जाईल त्या क्षणी सर्व जग एका दिव्य प्रकाशात न्हाऊन निघेल आणि एका शाश्वत आणि शांततामय पर्वात प्रवेश करेल.

म्हणूनच आशेची संहिता ज्याच्याकडे असेल त्याच्यावर प्रचंड जबाबदारी असेल, कारण एक दिवस जगातल्या प्रत्येक भाषेतील या संहितेच्या सर्व प्रती एकत्र करून तो प्रेषित त्या सर्व भाषांची एक भाषा आणि सर्व पुस्तकांचे एक पुस्तक करेल. त्या संहितेची एखाद्या भाषेतली एखादी प्रत जरी त्या प्रेषितापर्यंत पोचू शकली नाही तर हजारो वर्षे प्रतीक्षा असलेली ती शाश्वत शांतता कधीच प्रस्थापित होणार नाही.

या संहितेचा एक भाग या जगाशी निगडित होता, तर दुसरा त्या

व्यक्तीशी संबंधित. शेवटी या विश्वातील प्रत्येक घडामोड़ीचा परिणाम मानवजातीवर होतच असतो आणि या मानवजातीअंतर्गत अगणित युद्धं आणि शांततेसाठी असंख्य प्रयत्न हे सुरूच असतात.

...या मानवजातीतीलच दैवी शक्ती असलेला एक 'प्रेषित', ज्याच्याकडं शेवटी हे पुस्तक जाईल, तोच त्या पुस्तकाचा शेवटचा आजवर बंद असलेला भाग उघडेल.


म्हणूनच 'आशेची संहिता' आणि तिचा अंतिम विश्वस्त (प्रेषित) या संपूर्ण शृंखलेचा एक भाग बनून राहण्याबरोबरच मधल्या प्रत्येक विश्वस्ताला त्याच्या हृदयातलं कुलूपही उघडायचं आहे. मानवजातीतील प्रत्येकाकडे ते कुलूप उघडून त्या दिव्य प्रकाशाकडे आणि त्याच्या पलीकडे असलेल्या चिरशांततेकडे जाण्याची क्षमता आणि शक्ती आहे. कारण हे पुस्तक प्रत्येकाच्या हृदयात लिहिलेलं आहे.

आयुष्यभर त्या संहितेचं रक्षण करण्याचं एक प्रकारचं समाधान अनुभवूनसुद्धा ती शेवटी ज्या विश्वस्त बालकाकडं सुपुर्द करायचं ते अजूनही न सापडल्याची चिंता त्या म्हाताऱ्याला सतावत होतीच. म्हणूनच ऊर फाडून टाकणाऱ्या खोकल्याच्या उबळीकडे आणि हातापायातून येणाऱ्या तीव्र वेदनांकडे त्यानं दुर्लक्ष केलं, कारण तो दयाळू मृत्युदूत लवकरच आपल्याला भेटणार याची त्याला खात्री होती. आता त्याला प्रतीक्षा होती ती फक्त ज्याच्याकडं ते पुस्तक सुपुर्द करायचं त्या बालकाची...

त्याला ते बालक सापडायचे संकेत मिळत होते आणि देवदूत त्याला मदतही करत होते. खरंतर परमेश्वर त्याच्यासाठी सर्व काही करतच होता. पण त्यानं काही जबाबदारी आपल्या सेवकांवर टाकली होती आणि तीच त्याला पूर्ण करायची होती. नाहीतर तो आपल्या 'त्या' मित्राला काय सांगणार होता?

आता सूर्य अस्ताला चालला होता. आपल्या थकलेल्या पण तेजस्वी डोळ्यांनी त्यानं त्या सात बेटांकडे पुन्हा एकदा निरखून पाहिलं आणि आपली पावलं वाळूच्या टेकडीच्या टोकाला असलेल्या सतराव्या गावाकडं वळवली. त्याचा पुढचा मुक्काम तिथे होता...

◆




# रुमी: आनंदघन

**सेरदार ओस्कान**

अनुवाद

**प्रमोद नाईक**

*खुसखुशीत छोट्या-छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान...*

**१**

माझं नाव फॅबिओ. एक असा इटालियन पेंटर ज्याला शरद आणि हेमंत ऋतू इस्तंबूलमध्ये तर वसंत आणि ग्रीष्म ऋतू पारोसमध्ये घालवायला आवडतो. शिवाय पारोसमधल्या त्या छोट्या दुकानांमध्ये जे समुद्राचे चित्र तू पाहिलेस, ज्या चित्राच्या मध्यभागी प्रतिबिंबित हृदय चितारलेले आहे, ते चित्र रेखाटणारा कलाकार मी आहे.

माझ्याविषयीच्या या एवढ्या प्राथमिक गोष्टी तुला माहिती असाव्यात, माझ्या प्रिय मित्रा.

इस्तंबूलमध्ये माझ्या घरात आपण एकत्र घालवलेल्या त्या क्षणांत तुला कळलं असेल की मी खूप आनंदी आणि मनमौजी माणूस आहे आणि हेही, की मला कॅपेचीनो खूप छान बनवता येते.

शिवाय मला असंही वाटतं की तुला मी आवडलो आहे. जरी आपण नुकतेच भेटलो असलो, अगदी काही तासच आपण एकत्र घालवलेत तरीही, तुला मी असं आवडणं आणि तू ते कसलाही आडपडदा न ठेवता व्यक्त करणं, मला खूप जास्त भावलं. तू निघताना जे बोलून गेलास ते मी कधीच विसरणार नाही.

''ऐक ना,'' तू म्हणालास, ''मला वाटतं की आपण खूप जुने मित्र आहोत, इतके जुने की या जगात येण्याआधीपासून आपण एकमेकांना ओळखतो आणि इथे असं पुन्हा भेटण्यासाठी कितीतरी वर्षं वाट बघावी लागली असेल आपल्याला, या दरम्यान काय काय घडलं, तू कशा कशातून पार पडून इथपर्यंत पोहोचलास, मला यातलं काहीच माहीत नाही, म्हणजे ते मला ऐकायचं नाही असं नाही, मला आवडेलच, पण गेले काही तास आपण एकत्र आहोत आणि त्या सगळ्याबद्दल तुला विचारावं असा क्षणच मला सापडला नाही, पण ठीक आहे, आता तू सापडलास मला, मग बाकीच्या तपशिलाला काय अर्थ?, मी कधीतरी नक्की परत येईन. फॅबिओ, आपण किनाऱ्यावर बसून भरपूर कॅपेचीनो पिऊयात आणि तेव्हा एकमेकांपासून लांब असताना काय घडलं त्या कहाण्या सांगूयात,''

आणि यावर माझं उत्तर :

''नक्की जॉन, असंच करूया आपण''

खोटं बोलणं जरा जडच जातं मला. जेव्हा जेव्हा मी खोटं बोलण्याचा प्रयत्न करतो ना तेव्हा दरवेळी माझा चेहरा लालबुंद होतो आणि आवाज कापरा, पण यावेळी मात्र खूप छान खोटं बोललो मी, निदान मला तसं वाटलं, आवाजात कंप येऊ दिला नाही, उलट माझ्या आवाजात निश्चय होता आणि माझ्या डोळ्यांत चमक होती तुला असं सांगताना, नक्की जॉन, असंच करूया आपण.

इतकंच नाही, तर आपण पुन्हा भेटणार आहोत हे तुला पटावं म्हणून

मी म्हणालो,

"मला ते प्रेमाचं चित्र बघायचं आहे आणि तू ते मला दाखवायला आणणार आहेस पुढच्यावेळी, हो ना?"

आणि तू म्हणालास, "सव्वालच नाही फॅबिओ, मी प्रॉमिस करतो," म्हणजे माझं खोटं बोलणं पचलं बहुदा. आणि तेव्हा पहिल्यांदाच मला जाणवलं की खोटं बोलूनसुद्धा जिवाला बरं वाटतं की कधीकधी.

आपली पुन्हा भेट होईल, हे तुला पटावं, या अपेक्षेनं मी खोटं बोललो. पण जे मी बोललोच नाही त्यातच काय ते खरं दडलेलं होतं. आता खरं काय आहे ते ऐक जॉन, पण त्याही आधी हे 'सत्य' कसं स्वीकारायचं तेही महत्त्वाचं आहेच, सत्य हे आहे की या जगात यानंतर आपली भेट होणं कधीही शक्य नाहीये.

माझं मन मला सांगतंय, तू शब्द दिलास तसा इस्तंबूलला नक्की परत येशील, कदाचित सहा एक महिन्यात, किंवा वर्षभरात, किंवा फारतर दोन वर्षांनी.

मी म्हणालो तुला, माझं दार तुझ्यासाठी सदैव उघडं असेल, अगदी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी इथेच असेन आणि अगदी कुठल्याही क्षणी इथे तुझं स्वागतच असेल, मला माहितीये तू यावर नक्की विश्वास ठेवशील. तुला खात्री असेल की इस्तंबूलमध्ये आपला एक वेडा कलाकार मित्र आहे, जो आपली वाट बघतो आहे, हो, इथे एक कलाकार तुझी वाट बघतो आहेच, पण त्यानं दिलेल्या वचनातली एक गोष्ट तुझ्या ध्यानातच आली नाही, ती म्हणजे, शेवटच्या श्वासापर्यंत.

तर मित्रा, जे सत्य मी तुझ्यापासून लपवलं ते हेच आहे, कारण मुळात माझे शब्द असत्य नव्हतेच, जेव्हा कुणी म्हणतं की, माझं दार तुझ्यासाठी सदैव उघडं आहे, त्याचा अर्थ माझ्या काळजाची दारं कायम उघडी आहेत तुझ्यासाठी असा नसतो का?

जेव्हा मी म्हणालो, तुझी वाट बघेन, तेव्हा ते या नश्वर नाजूक शरीराऐवजी, हृदय किंवा अस्तित्वाशी जोडलेलं नसेल का?

पण आताही मला वाटतं की, काही तरी असं असावं माझ्यामागे, तुझ्यासाठी, जे प्रत्यक्ष तुझ्या कवेत सामावू शकेल, माझ्या माघारी, तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेलं, कारण असं वाटेकडे डोळे लावून बसणं

आणि भेट झाल्यावरची ती चिंब मिठी अनुभवणं, नेहमीच शक्य नसतं ना?, म्हणूनच मित्रा, हातात गवसण्याजोगी एक गोष्ट मी मागं सोडून जाणार आहे आणि ती गोष्ट आहे हे पत्र जे या क्षणी मी फक्त तुझ्यासाठी लिहितो आहे.

आणि याला खरंतर पत्र म्हणता येईल असंही नाही, आपण याला पुस्तक म्हणूया, असं पुस्तक ज्यात मला अगदी प्रत्येक गोष्ट तुझ्यासोबत वाटायची आहे, तुला सांगायची आहे आणि ते सगळं तू समोर असताना सांगणं मला जमलं नसतं, मी याआधी कधीच पुस्तक लिहिलं नाही, त्यामुळे हे कसं असेल, कसं जमेल मला माहीत नाही, किंवा सगळं काही बैजवार तुझ्यापर्यंत पोहोचेल का हेही माहीत नाही, मला फक्त एकच माहीत आहे, सगळं तुला सांगायचं आहे.

कदाचित तुला मी आजच्या दिवसातल्या गमती सांगेन, किंवा माझ्या एखाद्या स्वप्नाबद्दल, किंवा माझ्या मनाला भिडलेल्या एखाद्या गोष्टीबद्दल लिहीन, किंवा गेली पासष्ठ वर्षं, आलेले सगळे चढउतार पार करत जगलेल्या माझ्या आयुष्याबद्दल सांगेन.

खरंच, मला जे काही आणि सगळं काही तुला सांगायचं आहे ते तुझ्यापर्यंत पोहोचेल का ते मला अजूनही माहीत नाहीये, पण या पुस्तकात, तुला माझ्याबद्दल जाणून घ्यायची प्रत्येक गोष्ट, नक्की असणार आहे.

अशी एक व्यक्ती आहे जी हे पुस्तक तुझ्यापर्यंत नक्की पोहोचेल याची काळजी घेईल, ती कोण आहे ते तुला नंतर सांगेन मी, हे पुस्तक तुला तिच्याकडूनच मिळेल.

तर, माझ्या मित्रा, तुला जाणवलं असेलच की, तुझ्यासाठी मी हे पुस्तक लिहिण्याचा खटाटोप का करतोय ते!, मी आता फार जगणार नाही.

पण निर्धास्त रहा, जीवात जीव असे तोपर्यंत, मी अशीच सुरेख कॅपेचीनो बनवत राहीन.

कदाचित आजच्यापेक्षा उद्या अधिक चांगली कॅपेचीनो बनवेन.

## २

कॅन्सर बराच पसरला आहे, असं डॉक्टरांनी चार महिन्यांपूर्वी सांगितलं होतं. कॅन्सरची सुरुवात फुफ्फुसात झाली होती आणि पसरत पसरत तो बाकीच्या अवयवांमध्ये पोहोचला. ते असंही म्हणाले की आहे अशा अवस्थेत

मी फारतर पुढचे सात आठ महिने तग धरू शकेन असं त्यांना वाटतं, पण जर किमोथेरेपी घेतली तर आणखी काही महिन्यांचा कालावधी मिळू शकतो, मृत्यूला ताटकळत ठेवण्यासाठी, अधेमधे येणारी खोकल्याची उबळ किंवा कधीतरी छातीत उठणारी कळ सोडली तर मी अगदी चारचौघांसारखा वाटतो. थोडासा अशक्तपणा सोडला तर मी आजारी आहे असं कुणाला वाटणारही नाही. असो, अजून तरी कुणाला माझी ही परिस्थिती माहिती नाही, अपवाद फक्त माझे डॉक्टर!

मी त्यांना याबद्दल कुणालाही न सांगण्याची कळकळीने विनंती केली आणि त्यांचा किमोथेरेपी घेण्याचा सल्ला अगदी नम्रपणे नाकारला.

हॉस्पिटलच्या एखाद्या खोलीत जगण्यासाठी तळमळत, धडपडत राहाण्यापेक्षा तीच ऊर्जा हे पुस्तक लिहायला वापरणं जास्त योग्य वाटतं मला आणि हा निर्णय चुकीचा नाहीये हे सिद्धच करायचं आहे आता मला. हे पुस्तक पूर्ण करायचं असेल तर मला अगदी रात्रंदिवस लिहावं लागणार आहे, पण म्हणून मी उगाच जबरदस्ती नाही करणार स्वतःवर, निवांत, माझ्या आनंदासाठी लिहित जाईन, कारण मनापासून, आनंदाने लिहिलं गेलं, तरच या पुस्तकाला अर्थ असेल, कारण एखादं पुस्तक, विशेषतः हे पुस्तक जर वाचणाऱ्याच्या काळजाला भिडावं असं वाटत असेल, तर ते निवांत, प्रेमानेच लिहिलं गेलं पाहिजे आणि ज्या गोष्टीत प्रेम असतं ती समाधान, आनंद देतेच, मनापासून बनवलेलं जेवण खाणाऱ्यालाही आवडतंच ना!

आणि यासाठीच मला हे पुस्तक लिहिताना ते छान एन्जॉय करायचं आहे, माझ्या धमन्यांमध्ये जरी मेडीटरेनीयन वंशाचं रक्त वाहात असलं; आणि त्याला आयुष्याचा आनंद कसा लुटायचा हे व्यवस्थित माहीत असलं तरी त्याचा इथे काहीच संबंध नाही. मला हे पुस्तक लिहिताना मस्त एन्जॉय करायचं आहे तरच ते मला हवं तसं लिहिलं जाईल असं मला वाटतं.

आणि म्हणूनच माझे हे अखेरचे दिवस मला खूप आनंदात व्यतीत करायचे आहेत. आनंद हा केवळ एखाद्या सन लाउंजरवर हातात कॉकटेल पकडून मस्त सनबाथ घेत लोळण्यातच नसतो किंवा एखाद्या यॉटवर छान वारा घेत एका किनाऱ्याकडून दुसऱ्याकडे सैर करण्यातही नसतो, खरा आनंद असतो ऊर भरून येण्यात आणि हृदयात निखळ शांतता असण्यात.

आता प्रत्येकाचा दृष्टिकोन साहजिकच वेगळा असू शकतो, पण माझ्यापुरतं सांगायचं तर मला आयुष्यानं हेच शिकवलं की सुख फक्त प्रेमातूनच मिळतं आणि प्रेम देऊनच मी आनंद मिळवू शकतो.

म्हणूनच जीवनाच्या या अखेरच्या टप्प्यात मला स्वतःला आणि माझ्या जगण्याला जास्तीत जास्त प्रेमानं भरून टाकायचं आहे, तरच माझ्या जिवलग मित्रा, मला वाटतं की हे जे पुस्तक मी तुझ्यासाठी मागे सोडून जाईन, ते प्रेमाने आकंठ भरलेलं असेल.

माझी ही इच्छा कितपत पूर्ण होईल माहीत नाही, पण या शेवटच्या दिवसांत, लोक म्हणतात की मी बऱ्याचदा छान हसताना दिसतो, माझ्या सभोवताली मी आनंद पेरत असतो म्हणे आणि ते ऐकून मला आणखी खूश व्हायला होतं.

तर या क्षणी एकूण अशी अवस्था आहे, पण जेव्हा माझा आजार बळावत जाईल, जेव्हा मी मृत्युशय्येवर असेन आणि वेदना सहन करणं अशक्य होईल, तेव्हा अवस्था कशी असेल मला माहीत नाही, म्हणूनच मला आत्ताच्या या प्रत्येक दिवसाचे, तासाचे, मिनिटांचे, अगदी प्रत्येक सेकंदाच्या असण्याचे आभार मानायचे आहेत, मला माझं हृदय प्रेमातच बुडवून टाकायचं आहे आणि माझ्या पेनमधून उमटणारा प्रत्येक शब्द हा माझ्या मनातून नव्हे तर त्या प्रेमातून उमटावा अशी देवाकडे प्रार्थना करायची आहे.

**३**

हे असलं काही तरी करायचा निर्णय का घेतला मी? मी हे पुस्तक का लिहितो आहे? आणि मी हे पुस्तक तुझ्यासाठीच का लिहितो आहे?

कारण एकतर तू भेटल्यावरच असं काही तरी लिहायची कल्पना माझ्या मनात आली, हे पुस्तक मी गेल्यावर माझ्यामागे काही तरी शिल्लक असावं म्हणून मी लिहित नाहीये, तर हे पुस्तक फक्त आणि फक्त तुझ्यासाठी लिहिलं जातंय. म्हणूनच हे एखादं पत्र असतं ना तसं वाटेल तुला, लोकांना त्यांच्या मृत्युनंतर माघारी त्यांची काही तरी आठवण शिल्लक राहावी असं वाटत असतं.

पण माझ्या डोक्यात तसं काहीही नाही, कधीतरी मलाही तसं वाटलं होतंच, नाही म्हणत नाही मी, पण ती खूपच जुनी गोष्ट आहे, कधीची ते

लक्षातही नाही, माझ्या आयुष्याकडून मी हे शिकलो की, कुणी जर त्याच्या मागे मौल्यवान, पवित्र आणि अक्षुण्ण असं काही ठेऊन जाऊ शकतं तर ते असतं प्रेमाने व्यतीत केलेलं जीवन, तसं जीवन ब्रम्हांडामध्ये एक सकारात्मक ऊर्जा प्रवाहीत करत असावं.

याची जाणीव मला खूप वर्षांपूर्वी माझी आजी जेव्हा या जगातून गेली तेव्हा झाली. तिच्या संपूर्ण आयुष्यात तिने तिच्या मुलांवर, नातवंडांवर, शेजाऱ्या-पाजाऱ्यांवर, तिच्याशी जोडल्या गेलेल्या अगदी प्रत्येक व्यक्तीवर फक्त आणि फक्त प्रेमच केलं, फक्त तिच्यामुळेच मला त्या दिव्य, अमर्त्य अशा प्रेमाची जाणीव झाली, मी अगदी लहान असतानाच.

आणि प्रेम नावाच्या त्या भावनेची खूण माझ्या मनात ठसली, त्याची जाणीव मला सतत होत राहिली. मी ते प्रेम, त्याचं अस्तित्व माझ्या या डोळ्यांसमोर बघू शकत होतो. ते प्रेम मला कधी शाळेत शिकवलं गेलं नाही किंवा घरच्यांनाही कधी त्याचा वेगळा संस्कार करावा लागला नाही. ते अगदी शाश्वत होतं. आणि ज्या कुणाला ते पाहायचं असेल किंवा अनुभवायचं असेल त्यांनी एकदा माझ्या आजीला भेटावं, बस्स!

तिच्या त्या प्रेमाच्या तऱ्हेबद्दल मी तुला पुढच्या भागात अजून सांगेनच, कारण माझा पुढचा जीवनक्रम तुला समजून घ्यायचा असेल तर ते गरजेचं ठरतं. एका लहान मुलाच्या आयुष्यात सुरुवातीलाच कोरलं गेलेलं ते प्रेम, त्याच्या पुढच्या आयुष्यात कसं हरवलं हे मी तुला सांगायलाच हवं.

४

माझी आजी समाजात फार प्रसिद्ध किंवा मान्यवर व्यक्ती नव्हती. तिला तिच्या त्या समुद्रकाठच्या छोट्या गावातले काही लोक आणि तिचे शेजारीच ओळखायचे, तिच्यावर जीव लावायचे. बस इतकंच.

या जगातून जाताना तिनं माघारी असं काहीच ठेवलं नाही, तिनं कसला शोध लावला नाही, ना कुठलं पुस्तक लिहिलं, ना एखादी संस्था उघडली ना एखादी शाळा, तिच्या ८६ वर्षांच्या आयुष्यानंतर वारसा म्हणून सांगायला तिनं काहीही महत्त्वाचं मागं ठेवलं नाही. फक्त एकच गोष्ट ती मागं ठेऊन गेली आणि ते म्हणजे तिनं तिच्या मुलांसाठी, नातवंडांसाठी समुद्राच्या काठावर बांधलेलं एक छोटंसं घर.

हे तेच घर होतं जिथे मी उन्हाळ्याच्या सुट्ट्या घालवत लहानाचा मोठा

झालो. घर कसलं? ते देऊळच होतं. आजी आमच्यावर सतत प्रेमाचा वर्षाव करत असायची. आम्ही हिवाळ्यात बोलोंगामध्ये असायचो आणि शाळेला सुट्ट्या पडल्या की, लगेच मी आणि माझी आई पोसितानोच्या त्या रम्य सुमद्रकिनाऱ्यावरच्या घराकडे धावत सुटायचो.

मित्रा, या पुस्तकात माझा हेतू तुला माझ्या त्या बालपणीच्या काळात घेऊन जाण्याचा नाही. माझ्या बालपणीच्या आठवणी सांगण्यापेक्षा किंवा त्यात फार खोल जाण्याऐवजी मी इतकंच म्हणेन की, त्या घरात माझ्या सभोवती जे काही होतं त्यामुळेच माझ्या पुढच्या आयुष्याला आकार मिळत गेला.

आता त्या घरात माझ्या सभोवती असं म्हणताना मला कुठले प्रसंग किंवा कुठल्या वस्तू सुचवायच्या नाहीयेत.

मला फक्त एकच गोष्ट सुचवायची आहे, माझी आजी आणि तिचं प्रेम!

आता तुला मी थोड्या वेळापूर्वी लिहिलेल्या काही ओळींमधला पोकळपणा किंवा खोटेपणा जाणवला असेल कदाचित, मी म्हणालो होतो की, महत्त्वाचं असं काहीच मागं ठेवलं नाही तिने. पण तसं नव्हतं. तिने मागे ठेवली तिची जीवन जगण्याची कला आणि ती कला कुठल्याही ऐहिक किंवा नजरेला दिसणाऱ्या एखाद्या गोष्टीपेक्षा कितीतरी जास्त शाश्वत होती.

तिला कधीच कसलं लिखाण करून माहीत नव्हतं, हे पण एक खोटंच बोललो म्हणायचो मी, एक नक्की सांगतो माझ्या मित्रा, जर मी माझ्या त्या आजीचा नातू नसतो तर आत्ता तुझ्या हातात तू हे जे पुस्तक धरलं आहेस ना, ते कधीच लिहीता आलं नसतं मला, या पुस्तकात जे काही अनावश्यक असेल त्याचा दोष माझ्याकडे, पण तुला यात असं काही गवसलं की जे तुझ्या हृदयात जाऊन पोहोचेल, एखादी झुळूक जी तुझ्या मनाला मोहवून टाकेल, तर लक्षात ठेव की, ती सुगंधी झुळूक त्या व्यक्तीकडून आली आहे जिने आयुष्यात कधीच कसलं लिखाण केलं नव्हतं आणि म्हणूनच, हे पुस्तक तिचंसुद्धा आहे!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# अमर हृदय

**सेरदार ओस्कान**

अनुवाद
**डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**

*खुसखुशीत छोट्या-छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान...*

१

**मिनी बस - सकाळी १० वाजता**

सूर्योदय होण्यापूर्वीच डायना उठली होती. तिचा लाडका गुलाबी ड्रेस आणि गुलाबी जोडे घालून ती अगदी जय्यत तयार झाली होती. किमान तासभर तरी ती प्रत्येक सेकंद मोजत होती. ते करतानाच स्वयंपाकघरात जाऊन तिने काही भांड्यांची आदळआपट केली. बैठकीच्या

खोलीतलं फर्निचर उगाचच इकडून तिकडे केलं. घरातली तीन दारं किमान एकदा तरी आपटली. आजच्या सकाळी घरातलं कोणी झोपलेलं असणं तिला मान्य नव्हतं; अगदी कुणीही नाही!

मिनी बस पकडण्यासाठी त्यांना घरातून उशिरात उशिरा किमान नऊ वाजता तरी निघावंच लागणार होतं. बरोबर दहा वाजता मिनी बस तिच्या शाळेसमोरून सुटणार होती. घरापासून तिची शाळा साधारण पंचेचाळीस मिनिटांच्या अंतरावर होती. तसं पाहिलं तर अजून साडेसहासुद्धा वाजले नव्हते; पण तिची घालमेल सुरू होती. काहीही असलं तरी घरातल्या प्रत्येकाने उठायलाच हवं होतं. इतकंच नाही तर घड्याळाचे काटे नऊवर येण्याआधी सगळ्यांनी तयार राहायला हवं होतं. गेले १६८ दिवस आणि १७ तास डायना या सकाळची वाट पाहत होती. नऊ वाजेपर्यंत तिच्या कुटुंबातल्या इतरांना थोडी वाट पाहावी लागली तर असं काय बिघडणार होतं?

हो, एव्हाना सगळ्यांनीच उठायला हवं होतं. मात्र, ती करत असलेल्या आवाजामुळे तिचे आजोबा तेवढे जागे झाले. किमान, स्वत:च्या खोलीतून बाहेर येणारे ते एकटेच होते. जांभळ्या बारीक रेषा असलेला पायजमा त्यांनी घातला होता. हळूच चालत डायनाजवळ येत ते म्हणाले, ''डायना, अजून खूप अवकाश आहे. जा बरं, जरा वेळ झोप.''

''पण आजोबा, आम्ही वेळेवर पोहोचलो नाही तर माझी मिनी बस निघून जाईल.''

''त्याची काळजी करू नकोस. कुठेही जाणार नाही ती बस. जा बरं, थोडी झोप अजून, मी उठवतो ना तुला योग्य वेळेस.''

आजवर तिच्या आयुष्यात इतकं वाईट कुणीच काही सुचवलं नव्हतं. झोप? हं! आजच्यासारख्या दिवशी? तेही, घरातून निघायला जेमतेम काही तास उरले असताना? समजा, सगळ्यांना अति झोप लागली आणि मिनी बस चुकली, तर? दुसरी मिनी बस तरी मिळणार होती का? नाही! जणूकाही तो कार्यक्रम पुन्हा दुसऱ्या एखाद्या दिवशी आणि वेळेस दाखवणार होते! तिच्या शाळेतल्या शिक्षिकेने सर्व वर्गासाठी तिकिटं घेतल्यानंतर इतरांसाठी तिकिटं तरी उरली होती का? छे! आजोबांची सूचना एकदम बेकार! आजवरच्या आयुष्यात कधी तिने इतकं वाईट ऐकलं नव्हतं. झोप? हं!

डायनाने खोलीत गेल्याचं नाटक केलं. ते पाहताच पेंगुळलेल्या डोळ्यांनी आजोबा त्यांच्या खोलीत गेले. अंदाज घेत थोडा वेळ ती थांबली. पुन्हा तिचा मोर्चा स्वयंपाकघराकडे वळला. परत एकदा भांड्यांची आदळआपट, दारं जोरात बंद करणं, असे प्रकार तिने केले. सरतेशेवटी, कोणालाही उठवण्याचा प्रयत्न नाइलाजाने सोडून तिने हातात तिचं पुस्तक घेतलं आणि बागेतल्या झोपाळ्याकडे मोर्चा वळवला. संपूर्ण चित्रमय असं हे पुस्तक तिने गेल्या आठवड्यात एकूण नऊ वेळा वाचलं होतं. त्यातले शब्द तर ती वाचत होतीच; पण त्याहून तिचं लक्ष पुस्तकातल्या चित्रांकडे जास्त होतं. कित्येकदा तासन्तास चित्र न्याहाळण्यात तिचा वेळ जात असे. त्यात दाखवलेले आश्चर्यकारक प्राणी तिच्या दिवास्वप्नात येत असत. सरतेशेवटी, तो दिवस येऊन ठेपला. अवघ्या काही तासांत ती मिनी बसमध्ये चढणार होती. त्यानंतर दीड तास प्रवास केल्यावर ती त्या विशिष्ट जागी पोहोचणार होती. मुद्दाम बांधण्यात आलेला तो एक तलाव होता. बरोबर बारा वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली, की या चित्रातला प्राणी तिला प्रत्यक्षात दिसणार होता. खरोखरचा प्राणी! ती त्याला भेटणार होती, स्पर्श करू शकणार होती आणि प्रशिक्षकाने अनुमती दिली तर त्या प्राण्याबरोबर पोहणारसुद्धा होती. समजा, प्रशिक्षकाने नकार दिला तर? मग तिच्याकडे योजना 'ब' तयार होती. ती स्वत:ला तलावात झोकून देणार होती. या प्राण्याबरोबर पोहण्याची संधी प्रत्यक्षात इतकी समोर असताना ती गमावून कसं चालणार होतं? तिचा तसा उद्देशही नव्हता. या असामान्य सस्तन प्राण्याला भेटण्याआधी डायनाने 'गुलाबी डॉल्फिन' या पुस्तकाचं मुखपृष्ठ उघडलं. आतल्या फोटोंवर तिला परत एकदा नजर टाकायची होती, जाण्याआधी शेवटची नजर.

२

## गुलाबी डॉल्फिन

गुलाबी डॉल्फिन! अगदी खरेखुरे!

गुलाबी डॉल्फिन हे चिनी पांढऱ्या डॉल्फिनच्या जातकुळातले वैशिष्ट्यपूर्ण प्राणी आहेत असं समजलं जातं. इंडो-पॅसिफिक हम्पबॅक जातीचे ते सदस्य आहेत. आकर्षक गुलाबी रंगामुळे ते ओळखले जातात. साधारणत: चीन, हाँगकाँग, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम यांच्या किनाऱ्यावर छोट्या

संख्येत हे गुलाबी डॉल्फिन आढळतात. जगामध्ये त्यांची संख्या फार मर्यादित आहे. दुर्दैवाने, त्यांची प्रजाती आज धोक्यात आली आहे. नवल म्हणजे, जन्मत: या डॉल्फिनचा रंग काळा असतो. अल्पावधीतच तो बदलून राखाडी होतो. त्यानंतर हळूहळू त्यांचा रंग गुलाबी होऊ लागतो. तूर्तास, ते खूप कमी प्रमाणात आढळत असल्याने त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गुलाबी रंगाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. शास्त्रज्ञ त्यावर काम करत आहेत.

डायनाच्या पुस्तकाची सुरुवात अशी होती. ते पुस्तक पहिल्यांदा वाचताना तिला जी शिरशिरी जाणवली होती तीच शिरशिरी आत्ता शेवटचं वाचतानासुद्धा जाणवली. पुन्हा एकदा ती विचारात हरवली. या जगात किती गुलाबी डॉल्फिन असतील, असा प्रश्न तिला पडला. गुलाबी, हा गुलाबी डॉल्फिनचा आवडता रंग होता का, समजा त्यांना 'म्हातारीचे गुलाबी केस' खायला दिले तर आवडतील का, असे अनेक प्रश्न तिच्या मनात उद्‌भवले होते....

गुलाबी डॉल्फिन गुलाबी का आहेत, याबद्दल आता ती फारसा विचार करत नव्हती. ते गुलाबी का आहेत हा मुद्दा आता फारसा महत्त्वाचा नव्हता. ते गुलाबी आहेत, ते डॉल्फिन आहेत आणि डायनाला गुलाबी रंग आणि डॉल्फिन या दोन्ही गोष्टी खूप आवडतात, इतकंच महत्त्वाचं होतं. तसं पाहिलं तर, ते गुलाबी असोत, राखाडी असोत किंवा काळे; डायनाला मुळात डॉल्फिन फार आवडत. त्यातून ज्या क्षणी तिने गुलाबी डॉल्फिनचा फोटो पाहिला त्या क्षणी तिचा तर स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. तिला फार आश्चर्य वाटलं होतं. बघता क्षणीच ती त्यांच्या प्रेमात पडली होती.

अवघ्या पाच महिन्यांपूर्वी गुलाबी डॉल्फिनच्या जगातल्या अस्तित्वाची डायनाला कल्पनासुद्धा नव्हती. नंतर तिला समजलं, की शाळेतसुद्धा कुणालाच त्यांची माहिती नव्हती. गेली कित्येक वर्षं ती शाळेत जात होती; पण गुलाबी डॉल्फिन अस्तित्वात आहेत हे तिला कुणीच शिकवलं नव्हतं. का बरं नसेल शिकवलं? जगात गुलाबी डॉल्फिन आहेत असं शिक्षकांनी मुलांना का बरं सांगितलं नसेल? कुणी सांगावं, कदाचित त्यांनाही माहीत नसेल. पण, माहीत असायला हवं होतं! तसं त्यांनी शिकायला हवं होतं. जगात गुलाबी डॉल्फिन आहेत, हे मुलांना सांगता येण्यासाठी तरी त्यांनी ते शिकायला हवं होतं.

याच जगात काही धाडसी शिक्षकसुद्धा असतात. सौ. वेबर त्यापैकीच एक होत्या. पाच महिन्यांपूर्वी त्या वर्गात आल्या तेव्हाच त्यांचे डोळे लकलकत होते. आत येताच त्या म्हणाल्या, ''काय नशीबवान आहात मुलांनो तुम्ही! मी तुमच्यासाठी एक आश्चर्य वाटेल अशी गंमत घेऊन आले आहे.'' त्यांनी हातातल्या भल्या मोठ्या रंगीबेरंगी पोस्टरची गुंडाळी उलगडली.

त्या पोस्टरवर एका कार्यक्रमाची माहिती दिली होती. तो एका बाहेरच्या देशातला कार्यक्रम होता. त्यामध्ये सहभागी असणार होते दोन सील मासे, दोन लहान व्हेल मासे आणि एक गुलाबी डॉल्फिन आणि त्याचे प्रशिक्षक. जवळच्या एका शहरात एक दिवसाचा खेळ करून दाखवण्याकरता ते येणार होते. फक्त एकच खेळ! त्यानंतर दुर्गम भागातल्या त्यांच्या देशात ते परतणार होते.

हे सगळं सांगितल्यावर वेबर बाईंनी मुलांना विचारलं, ''हे पाहा, माझ्याजवळ एक चांगली बातमी आहे आणि एक वाईट बातमी आहे. आधी कोणती ऐकायला आवडेल तुम्हाला?''

सगळा वर्ग एक सुरात ओरडला, ''आधी वाईट बातमी!''

''बरं तर,'' बाई म्हणाल्या. ''दुर्दैवाने, या एकमेव खेळाची सगळी तिकिटं विकली गेली आहेत.''

वर्ग अचानक गप्प झाला. पुढच्या क्षणी सगळ्यांनी एकदम बोलायला सुरुवात केली. गुलाबी डॉल्फिनचं चित्र पाहून जी मुलं मंत्रमुग्ध झाली होती, त्यांना संधी हातातून गेल्याचं ऐकून फार वाईट वाटत होतं. जो खेळ पाहता येणार नाही, त्यासाठी वेबर बाईंनी आपल्याला आशेला का लावावं, असंही त्यांना वाटत होतं. ते आपापसात तावातावाने बोलू लागले. डायना दोन्ही हात तोंडावर ठेवून वेबर बाईंकडे पाहत होती. एखादा अपघात पाहिल्यावर आपण कसं तोंडाचा 'आ' करून दोन्ही हात तोंडावर ठेवतो ना, तशी तिची अवस्था होती.

वेबर बाई पुढे म्हणाल्या, ''आता एक चांगली बातमी सांगते. या खेळाची उरलेली शेवटची तेरा तिकिटं मी तुमच्यासाठी विकत घेतली आहेत. या गुलाबी डॉल्फिनवर एक पुस्तक आहे. तुम्ही त्याचा अभ्यास करायचा, त्यावर मी तुमची परीक्षा घेणार आणि ज्या मुलांना सगळ्यांत जास्त मार्क मिळतील त्या मुलांना मी या खेळाला घेऊन जाणार आहे.''

हे ऐकताच इतका वेळचा ताण जाऊन मुलांनी हुश्श केलं. सगळ्यांना खूप आनंद झाला. वेबर बाई खरंच महान होत्या! अगदी खऱ्याखुऱ्या हिरो होत्या त्या!

आणि मग? वेबर बाईंनी वर्गाला चांगली बातमी सांगून दोन आठवडे झाले होते. डायनाच्या हातात आत्ता जे पुस्तक होतं त्यावर आधारित परीक्षा त्यांनी घेतली. एकही चूक न होऊ देता डायनाने त्यात सर्वांत जास्त मार्क मिळवले. बाईंनी आणलेल्या तिकिटांपैकी सर्वोत्तम तिकीट तिच्या हातात पडणार होतं. तलावापासून सर्वांत जवळ असलेल्या जागेवर तिला बसता येणार होतं. आता फक्त वाट पाहणं तेवढं उरलं होतं. फार वाट पाहावी लागणार होती.

आज वाट पाहण्याचा शेवट होता. या दिवसाचं स्वप्न डायना रोज पाहत होती. तो गुलाबी डॉल्फिन वारंवार तिच्या स्वप्नात येत होता. इतकं सगळं असताना ती परत जाऊन झोपणार होती का? छे! आजोबांची सूचना खरंच फार म्हणजे, फार म्हणजे, फारच वाईट होती!

◆

**नवी संहिता... नवा आशय...**


**डेझर्टर**

**चार्ल्स ग्लास**

अनुवाद

**अवंती महाजन**

दुसऱ्या महायुद्धातून पळून गेलेल्या
डेझर्टर्सच्या मनोवेदनांचा घेतलेला
वास्तवपूर्ण वेध




**किंमत : ६००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# रिले

**मार्क लेव्ही**

अनुवाद

**प्रा. पुरुषोत्तम देशमुख**

*ॲन्ड्र्यू शोधतोय स्वत:चा खुनी...जोडीला नृशंस हत्याकांडातून वाचलेल्या दत्तक मुलांची कहाणी... उत्कंठेची चरमसीमा गाठणारी थरारक कादंबरी*

गर्दीमध्ये मिसळून जा. काय घडतंय हे कुणाच्या लक्षात येण्याआधी किंवा तुला कुणी पाहण्याआधी तुझं काम पूर्ण करून टाक.

तुला घाम फुटलाय हे कुणाला कळणार नाही. हडसन रिव्हर पार्कमध्ये सकाळी सात वाजता, प्रत्येक जण धावण्यासाठी येतो. जिथे सगळ्या वेळा ठरलेल्या आहेत आणि प्रत्येकाचीच कसोटी लागलेली

आहे अशा एखाद्या शहरात, लोक धावण्यासाठी बाहेर पडतात– बांधेसूद राहण्यासाठी, रात्रीचा हँगओव्हर घालवण्यासाठी, आणि सुरू होत असलेल्या दिवसाचा ताण झेलण्यासाठी.

एखादा बेंच शोध. तुझं लक्ष्य जवळ येण्याची वाट पाहण्यासाठी, त्या बेंचवर पाय ठेवून तुझ्या बुटांचे बंद पुन्हा बांध. तुझ्या कपाळावर आलेल्या तुझ्या हूडमुळे तुला सगळीकडे नीट पाहता येत नसेल; पण तुझा चेहरा झाकण्यासाठी तुला त्याचा उपयोग होतो. श्वासोच्छ्वास व्यवस्थित कर आणि तुझे हात थरथरत नाहीत ना, इकडे लक्ष दे. तुला घाम येतोय, पण ते ठीक आहे. त्यामुळे कुणाचं लक्ष तुझ्याकडे जाणार नाही किंवा कुणाला कळणारही नाही. प्रत्येक जणच घामागर्द झालेला आहे.

तुला तो जेव्हा दिसेल तेव्हा त्याला पुढे जाऊ दे. तू पुन्हा जॉगिंग सुरू करेपर्यंत काही सेकंद थांब. योग्य क्षण येईपर्यंत तुम्हा दोघांमध्ये चांगलं अंतर ठेव.

गेला आठवडाभर रोज याच वेळेला तू याची रंगीत तालीम केली आहेसच. ती कृती करण्याचा मोह दर वेळी वाढतोच आहे; पण काळजीपूर्वक पूर्वतयारी करण्यावरच तुझं यश अवलंबून आहे. चूक होऊन चालणारच नाही.

नेहमीप्रमाणे चार्ल्स स्ट्रीटवरून त्याचं लक्ष्य येत असतं. लाल सिग्नल येण्याची तो वाट पाहतो. पहिल्या चार लेन्स ओलांडून वेस्टसाइड हायवेकडे त्याला जायचं असतं. सगळ्या कार्स उत्तरेकडे वेगात जातात; लोक कामावर जायला निघाले आहेत.

तो मध्य भागापर्यंत पोहोचतो. ट्रॅफिक लाइटवरची छोटीशी मनुष्याकृती आधीच प्रकाशमान झाली आहे. ट्रिबेका आणि फिनान्शिअल डिस्ट्रिक्टकडे जाणाऱ्या कार्स लांबच लांब रांगेत एकमेकींना खेटून चालतात, तरी तो कसाबसा पुढे जात राहतो. वाजणाऱ्या हॉर्न्सना तो नेहमीसारखाच प्रतिसाद देतो- हाताची मूठ उचलून आणि मधलं बोट आकाशावर रोखून तो डावीकडे वळतो आणि हडसन नदीच्या बाजूनं जाणाऱ्या रस्त्यानं चालू लागतो.

धीम्या, दुडक्या चालीनं चालणाऱ्या इतर लोकांमधून वीस इमारतींच्या लांबीइतकं अंतर तो पळत असता, त्याच्याइतकं सक्षम नसणाऱ्यांना तो

मागे टाकतो तेव्हा त्याला आनंद होतो; आणि जे त्याला मागे टाकतात त्यांच्यावर तो चडफडतो. त्यांच्याकडे जोम असतो. तो अठरा वर्षांचा होता तेव्हा शहराचा हा भाग बकाल होता. या भागात येणाऱ्या अनेकांपैकी तो पहिलाच होता आणि धाप लागेपर्यंत धावत होता. तिथं पूर्वी खडकावर गोदी होत्या, माश्यांचा उग्र दर्प होता आणि तो गटारीतल्या पाण्याच्या दुर्गंधीत मिसळलेला असे... त्यातलं आता फारसं काही शिल्लक नव्हतं. गेल्या वीस वर्षांत त्याचं हे शहर किती बदललंय; ताजंतवानं आणि अधिक आकर्षक झालंय आणि मध्यंतरीच्या काळात ही वर्षं त्याच्या चेहऱ्यावर दिसायला लागली आहेत.

नदीच्या पलीकडे, जसजसा दिवस वर येतोय तसतसे होबोकेनचे दिवे मालवले जात आहेत आणि त्यापाठोपाठ लगेच जर्सी सिटीचेही.

त्याच्यावरची नजर ढळू देऊ नकोस. ग्रीनिच स्ट्रीटच्या अंतर्भागात तो पोहोचेल तेव्हा तो पादचाऱ्यांसाठी असलेला रस्ता सोडेल. त्यापूर्वी तुला तुझं काम करावं लागेल. याच विशिष्ट सकाळच्या वेळी तो त्याच्या रोजच्या मोकॅचिनो कॉफीची ऑर्डर देण्यासाठी स्टारबक्समध्ये जाणार नाही.

तो पिअर ४ मधून जाईल तेव्हा त्याच्या लक्षात येणार नाही; पण त्याचा पाठलाग करणाऱ्या सावलीनं त्याला गाठलेलं असेल.

पुढची आणखी एक इमारत. तुझा वेग वाढव. या ठिकाणी गडबड-गोंधळ करणारी गर्दी नेहमीच असते. त्या गर्दीत मिसळून जा; कारण इथं फुटपाथ अरुंद होतो आणि वेगात धावणाऱ्यांमध्ये हळूहळू धावणाऱ्यांचा अडथळा निर्माण होतो. तुझ्या शर्टाच्या बाहीमध्ये असलेली लांब सुई हलत असते. ती तुझ्या दुसऱ्या हातानं घट्ट धरून ठेव.

पाठीच्या खालचा मध्यभाग आणि सगळ्यात खालची बरगडी यांच्या मध्यभागी नेम धर. झट्कन सुई तिथे खुपस, एकदम खोल की त्याची किडनी आणि ओटीपोटातल्या रक्तवाहिनीला छिद्र पडलं पाहिजे. ती सुई बाहेर काढल्यावर रक्तवाहिनी फाटलेली असेल. काय झालंय हे कळेपर्यंत ती छिद्रं शिवणं अशक्य होऊन बसेल, ॲम्ब्युलन्स येईल आणि त्याला हॉस्पिटलमध्ये लगेच नेलं जाईल. या सकाळच्या वेळी हॉस्पिटलमध्ये लगेच पोहोचणं सोपं नसेल– इतक्या प्रचंड गर्दीतून अगदी सायरन वाजू

लागले तरी. कितीही उत्तम ड्रायव्हर असला तरी स्वतःच्या हतबलतेमुळे तो स्वतःलाच दोष देईल.

दोन वर्षांपूर्वी त्याला ही संधी मिळू शकली असती; पण सेंट व्हिन्सेंट्स हॉस्पिटल बंद झालं, आणि सर्वांत जवळचं इमर्जन्सी युनिट आता पूर्वेच्या बाजूला आहे, हडसन रिव्हर पार्कपासून पलीकडच्या बेटावर. तोपर्यंत खूप रक्तस्राव होईल; त्याच्या शरीरातून सगळं रक्त वाहून जाईल तिथे पोहोचेपर्यंत.

त्याला त्रास होणार नाही... निदान फार त्रास होणार नाही. त्याला थोडंसं गार वाटेल आणि मग जास्त गार वाटेल. त्याला हुडहुडी भरेल आणि हळूहळू त्याच्या सगळ्या अवयवांची संवेदना संपून जाईल, आणि त्याचे दात थडथडू लागतील, इतके की तो बोलूही शकणार नाही. नाहीतरी तो काय सांगणार आहे? त्याच्या पाठीत काहीतरी टोचल्यासारखं वाटत होतं म्हणून? मग काय झालं? त्यावरून पोलिसांना काहीच निष्कर्ष काढता येणार नाही.

परिपूर्ण गुन्हा असा काही असतोच. सगळेच सर्वोत्कृष्ट पोलीस ऑफिसर्स आपल्या कारकिर्दीच्या शेवटी कबूल करतातच ना, की न सुटलेल्या केसेसचं ओझं त्यांच्या मनावर असतं आणि त्यांचं दडपण त्यांच्या सदसद्विवेकावर असतंच म्हणून!


आता तू त्याच्या शेजारी आलायस. वाळूच्या पोत्यावर सुई खुपसण्याचा प्रयोग तू अनेकदा करून पाहिलास; पण मानवी शरीरात सुई खुपसताना येणारा अनुभव वेगळा असणार आहे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हाडावर आघात होऊ न देणं. मणक्याच्या हाडावर आघात होणं म्हणजे अपयशच. ती सुई खोल खोल जायला हवी आणि ताबडतोब बाहेर काढून शर्टाच्या बाहीमध्ये परत गेली पाहिजे. हे एकदा झालं की पुन्हा त्याच वेगात धावणं सुरू करायचं. मागे वळून पाहण्याचा मोह आवरायचा. जॉगिंग करणाऱ्यांच्या त्या गर्दीत अनामिक, अदृश्य राहा.

जी क्रिया करण्याच्या तयारीमध्ये तू तासन्‌तास घालवलेस, ती करण्यासाठी काही सेकंद पुरेसे आहेत.

त्याला मरण येण्यासाठी काही वेळ लागेल, कदाचित पंधरा मिनिटं; पण आता सकाळी साडेसातपर्यंत तो मेलेला असेल.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




देशपलीकडील लक्ष्मण

**लक्ष्मण माने**

*लक्ष्मण माने यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त*
*त्यांच्या कार्याचा घेतलेला लेखरूपी आढावा*

# लक्ष्मण माने नावाचे वादळ

**प्रा. विष्णू जाधव**

मी व्यवसायाने प्राध्यापक आहे. अर्थशास्त्र हा माझा विषय आहे. मी प्राध्यापक असलो तरी पहिल्यांदा लेख लिहीत आहे. वाचन मात्र भरपूर केले. फुले, आंबेडकर, मार्क्स व गांधी यांच्यावर

वाचन केले, पण लिखाणाची प्रेरणा मी कधी घेतलीच नाही हे मला प्रामाणिकपणे कबूल केलेच पाहिजे.

१९७७ पासून माझा डाव्या विचाराच्या क्रांतिकारी चळवळीशी संबंध आलेला आहे. युवक क्रांतिदलासारख्या चळवळीत मी कार्य केले आहे. पण मला लिहायला कधीच जमले नाही. त्याची प्रेरणाही मी कोणाकडून घेतली नाही.

अचानक संघटनेचे सरचिटणीस आयु. नारायण जावलीकरांचा मला फोन आला. मला त्यांनी लक्ष्मण माने यांच्या विचारांवर लेख लिहून पाठवा असे सांगितले. मी लगेच नेहमीच्या सवयीप्रमाणे होय म्हटले. वेळ मारून न्यावी अशी माझी धारणा होती. पण पुन्हा साहेबांचा फोन आला, की तुझा लेख लिहून पाठविणे. मी पुरता घाबरून गेलो. घाबरल्या अवस्थेतच साहेबांना लेख लिहून पाठवितो म्हणून होय म्हटले. साहेबांना खोटे बोलून चालणार नाही व यातून आपली पळवाट नाही. तेव्हा मनाशी निश्चय केला, की आपण काहीतरी साहेबांच्या विचारावर लिखाण करावे.

साहेबांवर लिहिण्यासारखे भरपूर आहे. माझे उर्वरित आयुष्य मी लिहीत बसलो तरी साहेबांवरील लिखाण संपणार नाही. मला कागदही अपुरा पडेल. मी जे या लेखात लिहिणार आहे ते वास्तवाला धरून असणार आहे. उगीच स्तुती केल्यासारखे असणार नाही. तोंडचोपडेपणा तर नाहीच नाही.

मी युवक क्रांतिदलामध्ये कार्य करीत असताना साहेबांना फक्त ऐकून होतो. त्यांच्या कार्याबद्दल इतर समाजवादी कार्यकर्त्याकडून माहिती घेत होतो. विषमता निर्मूलन शिबिरामध्ये साहेबांना मी पाहिले, त्यांचे विचार ऐकले, एवढ्या पुरताच मी त्यांना ओळखत होतो. विषमता निर्मूलन परिषदेमधील भाषणे ऐकली तर त्या भाषणांतून त्यांची भटक्या विमुक्त समाजाविषयीची पोटतिडीक व समाजाविषयीचा कळवळा, आग ओकल्यासारखे विचार ऐकून मी भारावून गेलो होतो. परंतु साहेबापर्यंत पोहोचण्याचा, त्यांच्या सहवासात राहून काम करण्याचा योग मला आला नाही. तसे प्रयत्न पण मी केले नाहीत; कारण मी पण मोठ्या खोट्या

आविर्भावाच्या तोऱ्यात होतो. अशीच एकदा पुणे येथे शिवाजी हायस्कूलमध्ये दोन दिवस विषमता निर्मूलन परिषद भरली होती. मी त्या परिषदेला गेलो होतो. परिषद संपल्यानंतर तिसऱ्या दिवशी मी व काही कार्यकर्ते रामराव जाधव, परभणी यांच्यासमवेत डॉ. बाबा आढावांच्या घरी गेलो होतो. बाबांबरोबर भटक्या विमुक्ताविषयी चर्चा करीत असताना बाबांनी मला सल्ला दिला की तू लक्ष्मण माने यांची भेट घेऊन त्यांच्याबरोबर चर्चा कर. बाबांची भेट झाल्यानंतर आम्ही सर्व कार्यकर्ते रामराव जाधव यांच्या बरोबर एस. एम. जोशी (अण्णा) यांच्या घरी गेलो. अण्णांनी आमचा सर्वांचा आदर केला. अण्णांबरोबर देखील मी भटक्या विमुक्ताविषयी चर्चा केली. तेव्हा अण्णांनी मला विचारले, तुझी लक्ष्मण मानेबरोबर ओळख नाही का? तेव्हा मी सांगितले, की त्यांना मी ओळखतो, परंतु ते मला ओळखत नसावेत. अण्णांनी पण मला प्रेमाचा सल्ला दिला की, तू लक्ष्मण मानेबरोबर चर्चा कर. मी विचार केला, की एवढ्या मोठ्या विचारवंतांबरोबर चर्चा करीत असताना ते मला लक्ष्मण मानेंची भेट घेण्यास का बरे सांगत असतील? हे काय गौडबंगाल आहे? त्यानंतर मी मनाशी असा निर्णय केला, की आता इथून पुढे भटक्या विमुक्ताविषयी कोणाबरोबर चर्चा करायची नाही. पण मनाला सारखी रुखरुख वाटत होती, की आपण ज्या समाजात जन्म घेतला, त्या समाजाच्या हालअपेष्टा, त्यांचे नरकासारखे जीवन हे मी जवळून बघत होतो. बिनचेहऱ्याची माणसे, जग काय आहे ते या समाजाला माहीत नाही, आपण कशासाठी गुराढोरांप्रमाणे, कुत्र्याप्रमाणे जीवन जगतो हे या समाजाला कळत नाही. या सर्व गोष्टी जवळून बघत असताना 'उपरा' नावाच्या आत्मकथनाचे वादळ महाराष्ट्रामध्ये आले. सर्व देश ढवळून निघाला होता. रोज वर्तमानपत्रातून 'उपरा'विषयी वाचत होतो. संपूर्ण देशाने 'उपरा'चे भरभरून कौतुक केले. या देशातल्या मी मी म्हणवणाऱ्या विचारवंतांना विचार करण्यास भाग पाडले आणि 'उपरा'च्या माध्यमातून लक्ष्मण माने नावाचे वादळ उदयास आले.

तेव्हा मला डॉ. बाबा आढाव व एस. एम. जोशी यांनी दिलेला प्रेमाचा सल्ला आठवला आणि मला जो प्रश्न पडला होता, हे काय

गौडबंगाल आहे, त्याचे उत्तर सापडले. 'उपरा' प्रसिद्ध झाल्यानंतर साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. वाड्या, वस्त्या, तांडे दिवसरात्र एक करून, पायाला भिंगरी बांधून फिरत होते. हे आम्ही नुसते डोळ्यांनी बघत होतो. वर्तमानपत्रातून वाचत होतो. त्यानंतर १९८९-९० च्या दरम्यान अचानक बातमी वाचली, की लक्ष्मण माने यांना राज्यपालांच्या कोट्यातून आमदार केले! साहेब आमदार झाले याचा मनापासून आनंद झाला. आता भटक्या विमुक्ताच्या वाट्याला काहीतरी मिळेल, त्यांचे दु:ख जाऊन समाजाचे प्रश्न सुटतील अशी माझी धारणा झाली.

१९९५ पर्यंत साहेब आमदार होते. १९९५ ला पुणे येथे शनिवार वाड्यासमोर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. शरदचंद्रजी पवार साहेबांना भटक्या विमुक्त संघटनेतर्फे मानपत्र देण्यात येणार होते. तो सोहळा बघण्यासाठी मी शनिवार वाड्यासमोर गेलो होतो. या कार्यक्रमात मी पहिल्यांदाच बघितले व ऐकले, की एक भटक्या विमुक्त समाजाचा नेता महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांविषयी परखड शब्दात बोलतो.

तेव्हापासून मनाने असा निर्णय घेतला की, आपण अशा सडेतोड, परखड बोलणाऱ्या नेत्याबरोबर कार्य केले पाहिजे. तेव्हा सातारा जकातवाडी येथे जाऊन साहेबांबरोबर संघटनेचे नि:स्वार्थपणे काम करण्याचा निर्णय घेतला. साहेबांनी संघटनेच्या सरचिटणीसपदावर माझी नियुक्ती केली. त्यांच्याबरोबर काम करीत असताना फार कठीण अनुभव येत होते. असे हाडाची काडे करणाऱ्या नेत्याबरोबर काम करणे ही काही सोपी गोष्ट नव्हे. संघटनेचे काम करीत असताना गेल्या १५ वर्षांत साहेबांनी अनेक वादळी व धाडसी निर्णय घेतले होते. या निर्णयातून त्यांनी या तमाम दीनदुबळ्या भटक्या विमुक्तांचे हित कसे साध्य करता येईल याचाच प्रयत्न केला. या वादळी व धाडसी निर्णयांपैकी एक अत्यंत महत्त्वाचा आणि संपूर्ण समाजाला क्रांतीच्या व परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाणारा निर्णय म्हणजे धर्मांतराचा निर्णय होय. धर्मांतराचा निर्णय घेण्याअगोदर साहेबांनी देशातील व महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांना व समाजसुधारकांना १६ एप्रिल व १७ एप्रिल २००५ रोजी जकातवाडी येथे बोलावून

घेतले. दोन दिवस या सत्रात अनेक विचारवंतांचे धर्मांतराबाबतचे विचार ऐकून घेतले. या चर्चासत्रातून आपण धर्मांतराचा क्रांतिकारक असा निर्णय घेतला व १४ ऑक्टोबर २००६ ला नागपूरच्या दीक्षाभूमीवर आम्ही भटक्या विमुक्त समाजातील निवडक कार्यकर्ते प्रातिनिधिक स्वरूपाचे धर्मांतर करणार आहोत अशी घोषणा केली. या घोषणांमुळे पुन्हा एकदा आपल्या नावाचे वादळ संपूर्ण देशांत निर्माण झाले होते. या देशातल्या मनुवाद्यांना फार मोठी चपराक बसली, तसेच हिंदू संस्कृतीला फार मोठा हादरा बसला. लाखो भटक्या विमुक्तांना घेऊन आपण बौद्ध धम्माकडे निघालात तेव्हा या देशातले धर्मसंस्थापक, राजकारणी शासनकर्ते, विचारवंत, साहित्यिक या सर्वांना आर्श्चयाचा धक्का बसला. त्यांनी धसका घेतला हिंदू धर्मवेड्यांना व हिंदुत्ववाद्यांना असे वाटले, की हिंदू धर्म समुद्रात बुडतो की काय? आपण जे चर्चासत्र आयोजित केले होते त्या चर्चासत्रात धम्म, धम्मदीक्षा आणि भोवतीचे सांस्कृतिक वातावरण या संदर्भात विचारमंथन केले.

या देशातील संपूर्णच अन्यायग्रस्तांना सम्यक्, सांस्कृतिक न्याय मिळून देण्यासाठी आयुष्यभर आंदोलनासारखे धगधगते राहिलेले महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आपले एकमेव प्रमाणशास्त्र आहे, हे आपण चर्चासत्रातून आम्हाला पटवून दिले.

बुद्धांचा धम्म हे काही धर्मशास्त्र नाही. ते सांस्कृतिक शास्त्र आहे आणि कृतिशास्त्र आहे. यामध्येच आपल्या समाजाचे हित आहे हे आपण आम्हा सर्व कार्यकर्त्यांना सांगितले.

धर्म शुद्ध तत्त्वावर आधारलेला असला पाहिजे. बुद्धाचा वर्णाश्रमपद्धतीवर कधीच विश्वास नव्हता. आपण सर्व सारखेच आहोत ही गोष्ट आपण कधीच विसरता कामा नये, माणसामाणसांत कसलाच भेदभाव नाही, जन्माने उच्च- नीच कोणीच असू शकत नाही हे आपण सांगत आलात. आपण सर्वांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला तर आपणास वैभव प्राप्त होईल. आपण आपल्या अठराविश्व दारिद्र्यातून, हागणदारीतून मुक्त होऊ या देशातील जातिभेद मोडायचा असेल तर आपण सर्वांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला पाहिजे.

बुद्धाचा धम्म अप्रतिम आहे. चित्ताची शुद्धता, अकुशलाचा त्याग, प्रज्ञेचे प्रामाण्य आणि करुणेचा आग्रह ही बुद्धाची शिकवण आहे. तथागताच्या शिकवणीने अनेक लोकांचे जीवन बदलते. बुद्धाने जुन्या समाजव्यवस्थेवर घाव घातले. नवीन समाजव्यवस्थेचा पाया रचला. चातुर्वर्ण्यावर आधारित विषम समाजव्यवस्थेवर धाव घातले. आम्ही भारतीय जातीचे बळी आहोत. जात जन्माने मिळते, स्वजातीयाशीच लग्नसंबंध करण्याच्या बंधनामुळे जात पोसली जाते हे आपण सतत सांगत आलात. मेल्यावरही जात माणसाचा पिच्छा सोडत नाही. माणसाची ओळख त्याच्या जातीवरूनच ठरते. जी काही केल्या जात नाही, ती जात असते. असे जातीचे समीकरण बनून गेले आहे. त्याचे हाल साहेब आपण भोगले आहेत. आपणामध्ये विद्वत्ता आहे. भल्याभल्या विचारवंताची आपण पाठ लोळवू शकता. तरी पण आपण शिखर गाठू शकला नाहीत. निवडणुकीच्या राजकारणात आपण आमदार होऊ शकत नाहीत. त्याचे कारण आपली जात हेच आहे. यासाठी आपण सतत सल्ला देत असता, की जात तोडो व समाज जोडो. यासाठी 'चलो चलो बुद्ध की ओर' हा नारा तुम्ही आम्हाला दिला. बुद्धाचा धम्म हा मैत्रीचा धम्म आहे. जे परित्यक्त आहेत, त्यागलेले आहेत, ज्यांचे कोणीही नाही अशांनाही अंगीकारण्याची इच्छा व्हावी अशी प्रेरणा म्हणजे हा धम्म आहे. जे पतित आहेत त्यांच्या उत्थानाची प्रेरणा देणारा धम्म आहे. जे पददलित आहेत, वारसाहीन आहेत त्यांच्याकरिता या धम्मात समतेचा दिव्य अलौकिक मार्ग आहे. अशी शिकवण आम्ही आपल्याकडून घेत आलोत, तसतसे आमचे मन बुद्धाकडे आकर्षित होत गेले.

बुद्धाच्या शिकवणीतील समाजपरिवर्तनाचा क्रांतिकारी संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखला व स्वीकारला. आज भारतातील कोट्यवधी दलित, शोषित, शूद्र, अतिशूद्र, भटक्या विमुक्त आपल्या दुःखाची कारणे जाणून त्या दुःखातून मुक्ती मिळेल या विश्वासाने संघर्ष करीत आहेत. समता स्वातंत्र्य आणि बंधुत्वावर आधारित समाजव्यवस्थेच्या उभारणीकरिता प्रयत्नशील आहेत, त्यांच्या संघर्षाचे दोन आधार आहेत. पहिला आधार भारताचे संविधान, ज्यामुळे त्यांच्या संघर्षाला विधिकायद्याचा

आधार मिळाला आणि दुसरा आधार म्हणजे, बुद्धाचा धम्म ज्याने त्यांच्या संघर्षाला नैतिक अधिष्ठान मिळवून दिले.

ईश्वर, आत्मा, ब्रह्म, नरक यांचा चक्रव्यूह म्हणजे धर्म नव्हे. माणसामाणसातील परस्परसंबंधांना जो नियंत्रित करील, माणसाने माणसाशी कसे वागावे हे जो शिकवील तोच खरा धर्म, अर्थात धम्म होय.

वरील सर्व बाबी साहेब आमच्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांना अनेक सभांतून भाषणांतून पटवून दिल्या आहेत. यानंतर आम्ही मनातून या निर्णयापर्यंत आलो, की आपणच नव्हे तर आपल्या सर्व समाजबांधवांनी बौद्ध धम्मात प्रवेश केला पाहिजे. दीक्षा घेतली पाहिजे. २ ऑक्टोबर २००६ रोजी आपण सर्व नागपूरच्या दिशेने दीक्षाभूमीकडे निघालो. त्यासाठी ३०० कार्यकर्त्यांची आपण निवड केली, परंतु प्रत्यक्षात नागपूर या ठिकाणी दीक्षा घेण्यासाठी हजारोंच्या जवळपास कार्यकर्ते आले होते. सकाळी ९ वाजता प्रसन्न वातावरणात, निळ्या आभाळाच्या छायेखाली भिक्खू संघाच्या साक्षीने, तसेच १५ ते २० लाख बौद्ध बांधवाच्या साक्षीने आम्हाला दीक्षा दिली व २२ प्रतिज्ञा आमच्याकडून वदवून घेतल्या. आम्ही सर्व धन्य धन्य झालोत. मनुवादी व हिंदुत्ववादी व्यवस्थेच्या जोखडातून मुक्त झालोत. आमच्या हिंदू धर्माच्या बेड्या नागपूरच्या दीक्षाभूमीवरच गळून पडल्या. हे केवळ आपल्यामुळेच शक्य झाले.

दीक्षा सोहळ्यानंतर साहेबांनी घोषणा केली, की ६ डिसेंबर मुंबई येथे रेसकोर्स मैदानावर लाखो भटके विमुक्त बौद्ध धम्माची दीक्षा घेतील. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढण्याचा, वाडया, वस्त्या, तांड्यावर जाण्याचा संकल्प आपण केला. परंतु मध्येच नियतीने फार मोठा घाव घातला आणि साहेबांच्या गाडीला पुणे-सातारा रोडवर कंटेनरची धडक बसली. साहेबांचा फार मोठा अपघात झाला. हा घातपाताचा प्रकार आहे काय, अशा शंकाकुशंका घेतल्या गेल्या. संपूर्ण समाज दुःखाच्या खाईत लोटला गेला. संपूर्ण देशातून, परदेशातून साहेबांच्या प्रकृतीची विचारणा होऊ लागली. मा. ना. शरदचंद्रजी पवारसाहेब, हे वैयक्तिक साहेबांच्या प्रकृतीकडे लक्ष ठेवून होते. श्रीमती सोनिया गांधींनी साहेबांच्या प्रकृतीची विचारपूस केली. जगातल्या अनेक राष्ट्रांतून प्रकृती ठीक होण्यासाठी

शुभसंदेश आले. बुद्धवंदना घेतल्या गेल्या. आमचे सर्वांचे मन खिन्न झाले होते. जहांगीर हॉस्पिटलमध्ये गर्दीचे लोंढे वाहू लागले. देशातील संपूर्ण बौद्ध समाज, भटका विमुक्त समाज हळहळ व्यक्त करत होता. या फार मोठ्या जीवघेण्या अपघातातून साहेब बुद्धकृपेने वाचले. आम्ही सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. एवढा मोठा अपघात होऊनदेखील साहेब थांबले नाहीत. प्रकृतीमध्ये साधारण सुधारणा झाली लगेच साहेब मोठ्या जोमाने धम्म रॅलीसाठी बाहेर पडले. वेळेअभावी ६ डिसेंबरला मुंबई येथील रेसकोर्स मैदानावर जाता आले नाही. तेव्हा साहेबांनी तारखेत बदल केला आणि २७ मे या तारखेला संपूर्ण भटका विमुक्त समाज मुंबई येथील रेसकोर्स मैदानावर बौद्ध धम्माची दीक्षा घेईल अशी घोषणा केली. पुन्हा धम्म रॅलीच्या माध्यमातून महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांच्या वाड्यावस्त्यांवर जाऊन दीनदुबळ्या समाजाला धर्म समजावून सांगितला जाऊ लागला. या धम्म रॅलीचा एवढा मोठा परिणाम झाला, की ३ लाखांच्या जवळपास भटके विमुक्त उपाशीतापाशी, मिळेल त्या वाहनाने २७ मे २००७ रोजी रेसकोर्स मैदानावर येत होते. हा धम्मसोहळा संपूर्ण देशाने टी.व्ही.वरून बघितला. जगातल्या मीडियाने, देशातल्या मीडियाने, वर्तमानपत्रांनी याची दखल घेतली. बाबासाहेबांचे या देशातील पूर्वाश्रमीचे बौद्ध सोडून इतर समाजातील लोकांना धम्मदीक्षा देण्याचे स्वप्न साहेबांच्या प्रयत्नांतून काहीशा प्रमाणात पूर्ण झाले असे मानण्यास काहीच हरकत नाही. रेसकोर्सवरील धम्मदीक्षा सोहळ्यानंतर महाराष्ट्रातील भटका विमुक्त समाज बौद्ध धम्म तत्त्वज्ञानाप्रमाणे जीवन जगण्यास शिकू लागला, हे नंतर भटक्या विमुक्तांच्या धम्म परिषदेमधून दिसून आले आहे. भटक्या विमुक्त समाजामध्ये झालेला हा जो सांस्कृतिक बदल आहे तो केवळ साहेबांमुळेच होऊ शकला. म्हणून साहेबांचे उपकार भटका विमुक्त समाज आजन्म विसरणार नाही असे मला वाटते.

**– प्रा. विष्णू जाधव**

सरचिटणीस, भटक्या विमुक्त जमाती संघटना,

ता. केज., जि. बीड

◆




# अभिप्राय


## शिवपुत्र राजाराम !

शिवछत्रपतींच्या पोटी जन्माला येणं म्हणजे थोर भाग्यच! आणि असं बलवत्तर नशीब घेऊन जन्माला आलेले दोन राजहंस, दोन राजपुत्र म्हणजे छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज; पण खरंच, शिवपुत्र होणं किती भाग्याचं होतं या दोघांसाठी? त्यांच्या 'युवराज' आणि 'राजपुत्र' असण्याने अशा किती मखमली पायघड्या नशिबाने त्यांच्यासाठी अंथरल्या? की फक्त संघर्षच या दोघांच्या वाट्याला आला?

आपल्या मराठी मुलखात नेहमी म्हटलं जातं, 'आपल्या बापजाद्यांनी केलेली मेहनत ही पुढच्या पिढ्यांच्या सुखाला कारणीभूत असते.' तसं सुख या दोन शिवपुत्रांच्या वाट्याला आलं का?

शिवछत्रपतींच्या अकाली निर्वाणानंतर स्वराज्याची सारी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन असंख्य आघाड्यांवर, अंतर्गत बंडाळ्यांवर मात करून अजिंक्य राहिले ते स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज. आपल्या महान पित्याने निर्माण केलेल्या स्वराज्याच्या मातीचा साधा एक कणसुद्धा, अस्मानी संकट होऊन, पाच लाखांचा सेनासागर घेऊन, कंदहार ते काबूल अशा सलतनतीचा बादशहा स्वत: मैदानात उतरून निकराने लढत असूनसुद्धा, त्याच्या हाती पडू न देणारे, सोबतच स्वराज्यातील अष्टप्रधान मंडळाने केलेल्या बंडाळ्या मोडून स्वराज्याची घडी नीट बसवणारे, रयतेचे असीम प्रेम मिळालेले आणि आपल्या

बलिदानाने अवघा महाराष्ट्र पेटवून टाकणारे धाकले धनी इतिहासाचा अवघ्या नऊ वर्षांचा कालावधी तेजस्वी करून टाकतात.




शंभू महाराजांच्या बलिदानानंतर स्वराज्याच्या गादीवर त्यांचे पुत्र येतील, आणि त्यांना आणि सोबतच मराठी दौलतीला आपण चुटकीसरशी संपवून टाकू असा मानस बाळगून असणाऱ्या आलमगीर औरंगजेबाला पहिला शह दिला तो महाराणी येसूबाई यांनी, पतीच्या निधनानंतर अल्पवयीन पुत्राला गादीवर बसवून स्वराज्याची सूत्रे हातात घेण्यापेक्षा त्यांनी आपल्या तरुण दिरास, शिवछत्रपतींच्या पुत्रास स्वराज्याचे छत्रपती करवून आपल्या मुरब्बीपणाची चुणूक औरंगजेबाला दाखवली. आणि इथे सुरू झाली शिवपुत्र राजाराम महाराजांची खरी कहाणी.

आभाळाएवढा कर्तृत्ववान बाप आणि सागरासारखा तुफानी कर्तृत्वाचा भाऊ अशा दोन परमप्रतापी छत्रपतींच्यानंतर गादीवर आलेल्या राजाराम महाराजांच्या हाती अवघे काही किल्ले आणि आणि मूठभर मावळे होते. इतिकदखान नावाचा अजगर रायगडाला विळखा घालून बसलेला असताना रात्रीच्या अंधारात या नवख्या छत्रपतीला दौलतीच्या अस्तित्वासाठी राजधानी सोडून प्रतापगड गाठावा लागला, तिथून पुढे पन्हाळा आणि नंतर विशाळगड. घरभेदी लोकांमुळे औरंगजेबास रायगड पाडणे जास्त काही अवघड गेले नाही आणि आपल्या मातोश्री, थोरल्या वहिनी येसूबाई, शंभुपुत्र शाहू आणि प्रथम पत्नी जानकीबाई यांना होणारी कैद महाराज थांबवू शकले नाही. मराठ्यांचा हा तिसरा छत्रपती संपवून अवघा दख्खन आपल्या घोड्यांच्या टापांखाली घेण्याच्या विचाराने औरंगजेब पछाडलेला असल्याने राजाराम महाराजांचे एका ठिकाणी वास्तव्य करणे अवघड होऊन बसले. रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी सचिव आणि येसूबाईंनी (कैदेत जाण्याआधी) दिलेल्या सल्ल्यानुसार राजाराम महाराजांनी अवघ्या काही मावळ्यांच्या सोबतीने कर्नाटकाचा प्रवास चालू केला. संताजी, धनाजी, खंडोजी अशा गादीशी

इमान असणाऱ्या मावळ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा आणि जिवाचं रान करून या शिवपुत्रासह बिदनूर, वेल्लोर मार्गे चंदीचा किल्ला गाठला. या सगळ्या प्रवासात बिदनूरची राणी चेनम्मा मराठ्यांच्या मदतीला आली. अवघ्या मराठी मुलखाचा छत्रपती, शिवपुत्र आणि शंभू महाराजांचा धाकटा भाऊ, ज्याच्या पायी सगळ्या सुखांनी लोळण घ्यायला हवी तो दौलतीसाठी, आपल्या वडील-बंधूंच्या अस्मितेसाठी वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी औरंगजेबासारखा बलाढ्य शत्रू पाठीवर घेऊन, घरादारापासून, आपल्या माणसांपासून, आपल्या मुलखापासून दूर एकटाच एका अनोळखी प्रदेशात जातो, हे वाचून मनाला यातना होतात. जिंजीला जाऊन पोहोचल्यावर स्वराज्याची घडी पुन्हा बसवण्यासाठी आपल्याजवळ असणाऱ्या मूठभर लोकांची मदत या छत्रपतींना होते. मराठी मुलखात अवघे दोन गड हाताशी असताना, फक्त काही हजार मावळे संगती असताना, परिस्थितीने पुरते कोलमडून जावे, अशी वेळ असताना हा शिवपुत्र मुरब्बी असं राजकारण करतो. वतनदारी पुन्हा सुरू करण्याचा धाडसी निर्णय घेतो. स्वराज्याचं अस्तित्व त्यांच्यालेखी महत्त्वाचं होतं. या वतनदारीच्या लोभापायी कितीतरी मुघल सरदार महाराजांच्या पदरी आले, फौजफाटा जमा व्हायला सुरवात झाली आणि जिंजीला इतिकदखान म्हणजेच झुल्फिकारखान याचा वेढा पडला. सरदारांची जुळवाजुळव, रायगडावर झालेलं मंचकारोहण यात राहिलेला महाराजांचा राज्याभिषेक उरकून घेऊन, चंदी (जिंजी) ही मराठा साम्राज्याची राजधानी झाली, अष्टप्रधान मंडळाची स्थापना झाली. संताजी यांना सरसेनापती तर खंडोजी यांना चिटणीस आणि निळोपंतांना पेशव्यांची वस्त्रे देऊन अष्टप्रधान मंडळ स्थिर केलं आणि नंतर सुरू होते ती औरंगजेबाच्या सरदारांशी रणधुमाळी, अवघ्या जगात ज्या लढवय्या सरदारांना कोणी मात दिलेली नाही त्यांना मराठ्यांनी सळो की पळो करून सोडलं. चार सरदारांचा मृत्यू हा फक्त मराठ्यांच्या रणांगणात होणाऱ्या भेदक हल्ल्याच्या थरकापाने होतो, शत्रूपेक्षा अर्धी फौज घेऊन शत्रूच्याच रस्त्यात ठाण मांडून त्याला पळवून लावण्याची धमक मराठ्यांमध्ये आलेली असते, राजा वेढ्यात अडकला म्हणून मावळ्यांनी तलवार गाजवण थांबवलं नाही, उलट आलमगीर दक्षिणेत उतरलेला पाहून त्याचा उत्तरेतील बराच प्रदेश मराठ्यांनी मारला, औरंजेबास पुरता सरदर्द देऊन टाकण्याचा मानस मराठ्यांनी उचलून धरला,

यातच औरंगजेबाचा संशयी स्वभाव त्याच्या पथ्यावर पडला आणि जिंजीला वेढा घातलेला त्याचा झुल्फिकारखान फितूर झाला. महाराजांशी आतून सलोखा करून त्याने वेढ्याचं फक्त नाटक केलं आणि महाराज दक्षिणेकडे रवाना झाले, महाराजांचे बंधू तंजावरचे अधिपती शहाजीराजे यांच्या मदतीने दक्षिणेकडे असणाऱ्या इतर राज्यांशी सलोखा करून, भविष्यात त्यांना अभय देण्याची शाश्वती देऊन महाराजांनी मुघल बादशहाच्या विरोधात मोठी मोर्चेबांधणी केली. औरंगजेबाचे दक्षिणेकडे असणारे सगळे मोठे सरदार संताजी आणि धनाजी यांच्या तलवारीने गारद झाले होते आणि म्हणून आता मराठ्यांना आवर घालणारा कोणीही या भूमीवर उरला नव्हता. उत्तरेतील बुऱ्हाणपूर, सुरत, औरंगाबाद आणि बरीच मोठी शहरे मराठ्यांनी लुटून मुघलांच्या नाकीनऊ आणले. हल्ला केलेला एक-एक किल्ला मराठ्यांनी वर्ष-वर्ष लढवला आणि शिबंदी संपल्यावर तो भली मोठी रक्कम घेऊन मुघलांना दिला आणि फिरून काही महिन्यांनी जिंकला, असे करून मराठ्यांनी मुघलांना पुरती मात दिली. राजाराम महाराज महाराष्ट्रात आले आणि त्यांनी सातारा ही तख्ताची जागा केली; पण तख्त म्हणजेच स्वत:ला सतत फिरस्ती ठेवून मुलुख सुरक्षित केला. सतत राजकीय उलाढाली करत औरंगजेबाच्या हाती एक चिमूटभर मातीसुद्धा लागू दिली नाही. असा हा मुरब्बी राजकारणी 'देवीच्या ज्वरा'स मात्र शह देऊ शकला नाही आणि मराठ्यांच्या तिसऱ्या छत्रपतीने औरंगजेबास अकरा वर्षं झुंजवत ठेवून मात दिली. सिंहगडावर त्यांची अखेर झाली. आपल्या पित्याच्या आणि बंधूंच्या तोलाचं कर्तृत्व दाखवून मराठ्यांचे तिसरे छत्रपती अमर झाले.


– **सार्थक जाधव,** परभणी

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# अथक

**स्वाती चांदोरकर**




अपंग असूनही अजिंक्य जवान...
सर्वसामान्यांना देतात जगण्याचं भान


**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# इफ्...

**डेव्हिड जे. स्मिथ**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**




व्यापक संकल्पनेचं संक्षिप्त रूप,
अभ्यासाला येतो हुरूप

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

**१६ जुलै ते १५ ऑगस्ट २०२४ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ जुलै दरम्यान खास सवलत**

**१६ जुलै - जॅकलिन गोल्ड यांचा जन्मदिन**

'अ वुमन्स करेज' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१७ जुलै - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांचा जन्मदिन**

'द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड', 'द केस ऑफ द काउंटरफिट आय', 'द केस ऑफ द क्रिमसन किस', 'द केस ऑफ द क्रुकेड कँडल', 'द केस ऑफ द डेडली टॉय', 'द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट', 'द केस ऑफ द हॉन्टेड हसबन्ड', 'द केस ऑफ द हाऊलिंग डॉग', 'द केस ऑफ द आइस-कोल्ड हॅन्ड्स', 'द केस ऑफ द लकी लूझर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०९०/- । सवलत किंमत १६४९/-**

**१८ जुलै - लॉरेन स्क्रग्ज यांचा जन्मदिन**

'एक लढा असाही...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१९ जुलै - सूर्यकांत जाधव यांचा जन्मदिन**

'आघात', 'अस्मिता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-**

**१९ जुलै - स्नेहलता जोशी यांचा जन्मदिन**

'अजून नाही जागी राधा', 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट','दडलेला इतिहास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७१०/-**

**२० जुलै - डॅनियन ब्रिंकली यांचा जन्मदिन**

'सीक्रेट्स ऑफ द लाइट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३८/-**

**२० जुलै - पोलेत बूर्ज्वा यांचा जन्मदिन**
'फ्रँकलिन मालिका (२९ पुस्तके)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८७५/-**

---

**२१ जुलै - माधवी देसाई यांचा जन्मदिन**
'असं म्हणू नकोस', 'धुमारे', 'हरवलेल्या वाटा', 'कांचनगंगा', 'कथा सावलीची', 'किनारा', 'मंजिरी', 'नियती', 'प्रार्थना', 'सागर', 'शुक्रचांदणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६७०/- । सवलत किंमत ११९९/-**

---

**२१ जुलै - अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा जन्मदिन**
'घणघणतो घंटानाद' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३५८/-**

---

**२१ जुलै - मायकेल कॉनेली यांचा जन्मदिन**
'सिटी ऑफ बोन्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**२२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन**
'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा', 'अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२३ जुलै - जीतेंद्र दीक्षित यांचा जन्मदिन**
'३५ दिवस : २०१९ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी', 'महाराष्ट्रातील महाबंड', 'लाल बर्फाचे खोरे', 'मुंबई आफ्टर अयोध्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४५०/- । सवलत किंमत १०१५/-**

---

**२५ जुलै - स. शं. देसाई यांचा जन्मदिन**
'अखेरची लढाई', 'महापर्व', 'पहिले जागतिक महायुद्ध', 'दुसरे जागतिक महायुद्ध', 'चंबळेच्या पलीकडे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११६३/-**

---

**२८ जुलै - कॅरोल हिगिन्स क्लार्क यांचा जन्मदिन**

'झॅप्ड' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०९/-**

**२९ जुलै - तिमिरी एन. मुरारी यांचा जन्मदिन**

'द तालिबान क्रिकेट क्लब' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१४/-**

**२९ जुलै - करेन रोझ यांचा जन्मदिन**

'स्क्रीम फॉर मी', 'डाय फॉर मी', 'आय कॅन सी यू' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९७५/- । सवलत किंमत ११२६/-**

**२९ जुलै - प्रभाकर परांजपे यांचा जन्मदिन**

'काळोखाचे थेंब' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत ११६/-**

**२९ जुलै - जे.आर.डी. टाटा यांचा जन्मदिन**

'जेआरडी टाटा यांची पत्रं', 'कीनोट : जे.आर.डी. टाटा', 'टाटा – एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती', 'जेआरडी : एक चतुरस्र माणूस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२३०/- । सवलत किंमत ८००/-**

**३० जुलै - नरेन्द्र मोहन यांचा जन्मदिन**

'कमबख्त निंदर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**३० जुलै - डॉमिनिक लॅपिए यांचा जन्मदिन**

'फ्रिडम अ‍ॅट मिडनाइट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

**खालील संचांवर १ ते १५ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१ ऑगस्ट - हर्मन मेलव्हिल  यांचा जन्मदिन**

'शिस्तीचा बळी', 'पाचूचे बेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २३१/-**

---

**१ ऑगस्ट - रॉबर्ट जेम्स वॉलर यांचा जन्मदिन**

'अद्वैत' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२१/-**

---

**२ ऑगस्ट - दिपा महानवर यांचा जन्मदिन**

'विमुक्ती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १०१/-**

---

**२ ऑगस्ट - कॅरोल ओ'कॉनर यांचा जन्मदिन**

'यशस्वी नेतृत्व' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ११९/-**

---

**३ ऑगस्ट - लिऑन युरिस यांचा जन्मदिन**

'एक्झोडस' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३३९/-**

---

**४ ऑगस्ट - जागतिक मैत्रिदिन**

'चौघीजणी', 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा', 'फाईव्ह पॉइंट समवन', 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ', 'एक होता मित्र', 'दोस्त', 'अदान ॲण्ड ईव्हा', 'मैत्री अशी आणि तशी...', 'बेधुंद', 'केवळ मैत्रीसाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४०४/- । सवलत किंमत १५२६/-**

---

**४ ऑगस्ट - राजीव तांबे यांचा जन्मदिन**

'बब्बड मालिका भाग १', 'बब्बड मालिका भाग २', 'बंटूचा टिक टिक मित्र', 'ससोब-हसोबा मालिका भाग १', 'ससोबा-हसोबा मालिका भाग २', 'अजब डोंगर आणि इतर कथा', 'राजाचा घोडा आणि इतर कथा', 'फुले फुलली आणि इतर कथा', 'चकाचक चंपू', 'उडणारी मगरूली', 'पुस्तक

वाचणारे फुलपाखरू' या सर्व संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २४२०/- । सवलत किंमत १७०४/-**

**४ ऑगस्ट - लीना दामले यांचा जन्मदिन**
'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'अशक्य भौतिकी', 'नाते ब्रह्मांडाचे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८१३/-**

**४ ऑगस्ट - रिचर्ड प्रेस्टन यांचा जन्मदिन**
'मायक्रो', 'द डेमन इन द फ्रीजर', 'द हॉट झोन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९७०/- । सवलत किंमत ५७९/-**

**५ ऑगस्ट - डेव्हिड बॉल्डाची यांचा जन्मदिन**
'द सिम्पल ट्रूथ', 'सेव्हिंग फेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५६९/-**

**५ ऑगस्ट - टॉड बर्पो यांचा जन्मदिन**
'स्वर्गाचा साक्षात्कार' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत ११९/-**

**६ ऑगस्ट - हिरोशिमा / परमाणू दिन**
'वॉर्सा ते हिरोशिमा', 'नागासाकी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२९५/- । सवलत किंमत ९०७/-**

**७ ऑगस्ट - ग्रेग चॅपल यांचा जन्मदिन**
'फिट फॉर ५०+ फॉर मेन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ९१/-**

**८ ऑगस्ट - वैशाली कार्लेकर यांचा जन्मदिन**
'विक्रम वेताळ मालिका भाग १', 'विक्रम वेताळ मालिका भाग २', 'विक्रम वेताळ मालिका भाग ३' या तीन भागांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८४०/- । सवलत किंमत ६३१/-**

**८ ऑगस्ट - सारा ड्युनांट यांचा जन्मदिन**

'सेक्रेड हार्ट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१४/-**

**८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन**

'आभाळ', 'बंधारा', 'भेटीगाठी', 'धिंड', 'गारवेल', 'घालमेल', 'इल्लम', 'जुगलबंदी', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'खुळ्याची चावडी', 'खुशखरेदी', 'लवंगी मिरची कोल्हापूरची', 'पाटलांची चंची', 'पाऊलवाटा', 'फक्कड गोष्टी', 'शापित वास्तू', 'श्रीगणेशा', 'ताजमहालमध्ये सरपंच', 'टारफुला', 'वळीव', 'वावरी शेंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३५९०/- । सवलत किंमत २६९२/-**

**१० ऑगस्ट - फुलनदेवी यांचा जन्मदिन**

'मी फुलनदेवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २६९/-**

**११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन**

'नेताजी', 'वॉर्सा ते हिरोशिमा', 'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८९०/- । सवलत किंमत ११९१/-**

**१३ ऑगस्ट - आचार्य अत्रे यांचा जन्मदिन**

'आचार्य अत्रे बारा गावचं पाणी', 'काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २७३/-**

**१५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन**


'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीरचक्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९१०/- । सवलत किंमत ९५५/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**






## सुप्रसिद्ध लेखिका लीना सोहोनी लिखित ‘अनुवादातून अनुसर्जनाकडे’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याची काही क्षणचित्रे

















## राजर्षी शाहू महाराजांच्या आठवणींची दिल्लीत उजळणी




खासदार छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते ‘शाहू महाराजांच्या आठवणी’ या पुस्तकाचे प्रकाशन दिल्लीतील महाराष्ट्र सदनात झाले. यावेळी उपस्थित खासदार छत्रपती शाहू महाराज, प्रकाशक अखिल मेहता आणि साहिल मेहता

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/07/2024 Posting Date : 11/07/2024

## आवर्जून वाचावे...





















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________